# भाजपने चिल्लरपणा बंद करावा..



■ **जळगाव :** भारतीय जनता पक्षाच्या वतीने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे पाकिस्तानवर केलेल्या हल्ल्याबद्दल कौतुक करणारी पोस्ट करण्यात आली आहे. या पोस्टवर आता राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या नेत्या रोहिणी खडसे या चांगल्याच संतापल्या आहेत. भाजपने हा चिल्लरपणा बंद करावा, असे आवाहन त्यांनी केले आहे. इतकेच नाही तर त्यांनी थेट पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना देखील यावरून प्रश्न विचारले आहेत.

रोहिणी खडसे यांनी भारतीय जनता पक्ष राजकारण करत असल्याची टीका केली आहे. याचा परिणाम देशाच्या एकजुटीवर या शिवाय भारतीय सैन्याच्या मनोबलावर देखील होईल, असे देखील त्यांनी आपल्या पोस्टमध्ये म्हटले आहे. त्यामुळे आपल्या ४० पैसेवाल्यांना सांगा की, असल्या पोस्ट बंद करा, असे आवाहन त्यांनी मोदी यांना केले आहे.

रोहिणी खडसे यांनी भाजपच्या एका पोस्टला प्रत्युत्तर देत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना प्रश्न विचारले आहेत. यामध्ये त्यांनी म्हटले की, नरेंद्र मोदी , भाजप हे जे काही करत आहे ते आपल्याला पटते आहे का? देश संकटात असताना सर्व जण पक्ष, राजकारण बाजूला ठेवून एकसंध उभे आहेत. हे भाजपला बघवत नाही का? भारतीय सैन्याचे जवान आपल्या प्राणांची बाजी लावून पाकिस्तान विरोधात लढत आहेत. अशा परिस्थितीत भाजप असे राजकारण करत असेल तर याने देशाच्या एकजुटीवर फरक तर पडेलच शिवाय सैन्याच्या मनोबलावरही परिणाम होईल. त्यामुळे आपल्या ४० पैशावाल्यांना सांगा की असला चिल्लरपणा बंद करा. असे आवाहन रोहिणी खडसे यांनी केले आहे.

# हे अमित शहांचे नेतृत्व स्वीकारणार का?



■ **मुंबई :** अमित शहा यांच्या नेतृत्वात शरद पवार यांनी काम करावे का? असा प्रश्न उद्धव ठाकरे गटाचे खासदार संजय राऊ यांनी उपस्थित केला. अमित शहा यांच्या नेतृत्वाखाली आम्ही काम करणार नाही, ही आमच्या पक्षाचे आणि कार्यकर्त्यांची भूमिका आहे. त्यासाठी राजकारण सोडून बाजूला जाऊ किंवा प्रतीक्षा करु. मात्र आम्ही त्यांच्या नेतृत्वाखाली आम्ही काम करणार नसल्याचे ते म्हणाले. त्यामुळे सुप्रिया सुळे आणि शरद पवार ते नेतृत्व स्वीकारणार आहेत का? हा प्रश्न असल्याचे राऊत यांनी म्हटले आहे. आम्ही त्यांचे चाहते आहोत, त्यामुळे आमचा हृदय तुटत असल्याचे देखील ते म्हणाले.

संजय राऊत म्हणाले की, ज्यांनी आमचा पक्ष फोडला, ज्यांनी आमचे सरकार पाडले, ज्यांनी सत्तेचा आणि पैशाचा गैरवापर करून महाराष्ट्राच्या पाठीत खंजीर खुपसला, त्यांच्याशी हात मिळवणी आम्ही करणार नाही. ही आमची स्वाभिमानी भूमिका आहे. आमचे साखर कारखाने किंवा शिक्षण संस्था नसल्यामुळे आम्हाला कोणतीच चिंता नाही. जे आमच्याकडे होते ते ईडीने आधीच घेतले आहे. त्यामुळे आम्ही परखडपणे उभे आहोत. त्या प्रवृत्ती विरोधात लढण्यासाठी आम्ही उभे आहोत, भारतीय जनता पक्षाने एकनाथ शिंदे आणि अजित पवार उभे केले आहेत. उद्या ते आणखी पन्नास जण उभे करतील. ते महाराष्ट्राची वाताहत करत असल्याचा आरोप त्यांनी केला.

पुरोगामी महाराष्ट्राच्या विचाराचे शरद पवार हे वारसदार आणि शिल्पकार आहेत. शरद पवार त्यांचा पक्ष संघषार्तून उभा केला आहे. अजित पवार आणि एकनाथ शिंदे यांचे पक्ष खरे नाहीत. हे अमित शहा यांचे पक्ष आहेत. हे अमित शहा यांनी निर्माण केलेले पक्ष आहेत. हे मी त्यांच्या तोंडावर देखील सांगतो. अमित शहा यांच्या पक्षात सुप्रिया सुळे जाणार आहेत का? असा प्रश्न राऊत त्यांनी उपस्थित केला.

# शिवसेना शहरप्रमुखांची आत्महत्या



■ **महागाव/यवतमाळ :** माहुर शिवसेना (उबाठा) शहरप्रमुख निराधारी जाधव यांनी अनंतवाडी शिवारातील जंगल भागात झाडाला गळफास घेत आत्महत्या केली. या घटनेमुळे परिसरात सर्वांनाचधक्का बसला आहे.

अनंतवाडी शिवारात वनमजुर विश्वंभर कुरवाडे हे जंगल भागात गस्त घालत असताना त्यांना झाडाला गळफास घेतलेल्या अवस्थेत निराधारी जाधव यांचा मृतदेह आढळून आला. कुरवाडे यांनी याची माहिती पोलिस पाटील दिनेश भारती यांना दिली. त्यांनी तत्काळ याची माहिती महागाव पोलिस ठाण्याला दिली. नागरिकांनी घटनास्थळी धाव घेत गर्दी केली. बिट जमादार संतोष जाधव घटनास्थळी दाखल होत पंचनामा करून मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी सवना ग्रामीण रुग्णालयात पाठवला. जाधव यांच्या आत्महत्येचे कारण अद्याप कळु शकलेले नाही. पुढील तपास महागाव ठाणेदार धनराज निळे यांच्या मार्गदर्शनाखाली बिट जमादार संतोष जाधव करीत आहेत.

# सिद्धिविनायक मंदिरात विशेष महापूजा

■ **मुंबई :** भारतीय सैनिकांच्या यशासाठी आणि त्यांच्या सुरक्षिततेसाठी मुंबईतील प्रसिद्ध सिद्धिविनायक गणेश मंदिरामध्ये विशेष महापूजा करण्यात आली. सैनिकांच्या सुरक्षिततेसाठी विशेष प्रार्थना के ल्याची माहिती गणपती मंदिर ट्रस्टचे अध्यक्ष सदा सरवणकर यांनी दिली.

सरवणकर म्हणाले की, महाराष्ट्र आणि विशेषतः मुंबईत दहशतवाद्यांच्या अशा हल्ल्यांमुळे नागरिक त्रस्त आहेत. मात्र या दहशतवाद्यांना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांसारखे उत्तर मिळालेले नाही. मात्र यावेळी जात, धर्म आणि समुदायातील सर्व लोक त्यांच्या निर्णयाच्या समर्थनार्थ एकत्र आले आहेत. त्यामुळेच भारतीय सैनिकांच्या शक्ती आणि यशासाठी ही विशेष प्रार्थना करण्यात आली असल्याचे त्यांनी वृत्तसंस्थेशी बोलताना सांगितले.

# अकरावीच्या प्रवेश शुल्कात कपात

## ऑनलाईन पद्धतीने होणार प्रक्रिया : विद्यार्थ्यांना मोठा दिलासा



■ **महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. १० :** राज्यात इयत्ता अकरावीच्या प्रवेश शुल्कात कपात करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. यामुळे विद्यार्थ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे.

येत्या शैक्षणिक वषार्पासून अकरावीची प्रवेश प्रक्रिया केंद्रीय ऑनलाईन पद्धतीने राबवण्याचा निर्णय शालेय शिक्षण विभागाने घेतला आहे. त्यासाठी विद्यार्थ्यांना भराव्या लागणाऱ्या नोंदणी शुल्कात कपात करण्यात आली आहे. आता विद्यार्थ्यांकडून शंभर रुपये शुल्क आकारले जाणार आहे.

गेल्या वर्षी ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेत विद्यार्थ्यांकडून आकारले जाणारे नोंदणी शुल्क मुंबईसाठी वेगळे आणि उर्वरित विभागांसाठी वेगळे होते. त्यानुसार मुंबईसाठी २२५ रुपये तर उर्वरित विभागांसाठी १२५ रुपये शुल्क आकारण्यात येत होते. आता अकरावीच्या ऑनलाईन प्रवेशांसाठी शिक्षण विभागाने स्वतंत्र संकेत स्थळाची निर्मिती केली आहे.

याच्या माध्यमातून १५ मेपर्यंत शाळा, कनिष्ठ महाविद्यालयांची नोंदणी करण्यात येणार असून, १९ मेपासून विद्यार्थी नोंदणीची प्रक्रिया सुरू केली जाणार आहे.

शिक्षण विभागाकडून अकरावीच्या प्रवेशांसाठी अधिकृत संकेतस्थळ विकसित करण्यात आले आहे. नवे संकेतस्थळ ९ मेपासून कार्यान्वित करण्यात आले आहे. शिक्षण विभागाने जाहीर केलेल्या वेळापत्रकानुसार शाळा, महाविद्यालयांनी १५ मेपर्यंत नोंदणी करून त्याचे प्रमाणीकरण करण्यात येणार आहे.

दहावीचा निकाल १५ मेपूर्वी जाहीर होणे अपेक्षित आहे, तर १९ ते २८ मे या कालावधीत विद्यार्थ्यांनी नोंदणी करणे अपेक्षित असून, प्राधान्यक्रमही नोंदवले जाणार आहेत.

१५ ऑगस्टपर्यंत अकरावीचे केंद्रीय ऑनलाईन प्रवेश पूर्ण करण्याचे उद्दिष्ट असून सुमारे १६ लाख ७६ हजार जागांसाठी प्रवेश प्रक्रिया होणार आहे. कनिष्ठ महाविद्यालयांचे वर्ग ११ ऑगस्टपासून सुरू केले जाणार आहेत. केंद्रीय ऑनलाइन प्रवेश प्रक्रियेसाठी राज्यातील जवळपास ११ हजार ७०० कनिष्ठ महाविद्यालयांतील अकरावीच्या सुमारे १६ लाख ७६ हजार जागा उपलब्ध होणार असून, या माध्यमातून अकरावीच्या प्रत्येक विद्यार्थ्याच्या प्रवेशावर लक्ष राहणार असल्याचे विभागाकडून सांगण्यात आले.

# मत्स्य व्यवसायाला अखेर कृषीचा दर्जा

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १० :** राज्यातील मच्छीमार आणि मत्स्य व्यवसायाशी संलग्न घटकांसाठी मोठी आनंदवार्ता. राज्य सरकारने आजपासून प्रभावी होईल असा ऐतिहासिक शासन निर्णय जाहीर करत मत्स्य व्यवसाय क्षेत्राला कृषी क्षेत्राचा दर्जा दिला आहे. परिणामी, या व्यवसायाला कृषी क्षेत्रातील सर्व पायाभूत सुविधा आणि सवलती मिळणार आहेत.

राज्याचे मत्स्य व्यवसाय आणि बंदरे मंत्री नितेश राणे यांच्या पाठपुराव्यामुळे मंत्रिमंडळाच्या अलीकडील बैठकीत या निर्णयाला मंजुरी मिळाली होती. त्यानंतर तातडीने शासन निर्णय जारी करण्यात आला असून आजपासून याची अंमलबजावणी सुरू झाली आहे.

या निर्णयामुळे मच्छीमार, मत्स्यकास्तकार, मत्स्य उत्पादक, बीज संवर्धक, बोटुकली संवर्धन करणारे, साठवणूक, प्रतवारी आणि आवस्टन करणारे घटक यांना कृषी क्षेत्रातील सुविधा जसे सवलतीच्या दरात वीजपुरवठा, कृषी दराने कर्ज, किसान क्रेडिट कार्डचा लाभ, कमी हप्त्याचा विमा संरक्षण आणि सौर ऊर्जेसंबंधी अनुदान मिळणार आहे. मत्स्य व्यवसायाचे कृषी दर्जात रूपांतर केल्याने, राज्यात मत्स्य उत्पादनात वाढ होणार असून स्थानिक पातळीवर रोजगारनिर्मितीला चालना मिळणार आहे. विशेष म्हणजे, या निर्णयात मत्स्य व्यवसायाशी संबंधित सर्व घटकांची स्पष्ट व्याख्या प्रथमच शासन स्तरावर करण्यात आली आहे.

# ऑनलाइन बदल्याविरोधात अंतर्गत विरोध

## परिवहन विभागातील सहायक, मोटार वाहन निरीक्षक आक्रमक

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १० :** राज्यातील मोटार वाहन निरीक्षकांची ऑनलाइन बदली प्रक्रिया शासनाच्या बदली अधिनियम २००५ आणि समुपदेशनाने बदली २०१८ या धोरणाशी सुसंगत नसल्याचा आरोप केला जात आहे.

सहायक आणि मोटार वाहन निरीक्षकांकडूनच या बदली प्रक्रियेला विरोध केला जात असून राज्याच्या परिवहन अपर मुख्य सचिवांकडे अनेक तक्रारी दाखल केल्या आहेत. ऑनलाइन बदली प्रक्रियेमुळे समान संधी, न्याय सर्वांना मिळत नसल्याचा आरोप अधिकाऱ्यांकडून केला जात आहे.

अधिनियमानुसार प्राधान्यक्रम लावताना अधिकारी स्वतः किंवा अधिकाऱ्यांच्या कुटुंबातील दुर्धर आजाराने ग्रस्त असल्यास किंवा पती, पत्नी शासकीय सेवेत असल्यास अधिकारी नक्षलग्रस्त भागात कार्यरत असल्यास त्यांना प्राधान्यक्रम देणे बंधनकारक आहे. मात्र, ऑनलाइन बदली प्रक्रियेमध्ये राज्याच्या बदली अधिनियमांचे सर्रास उल्लंघन होत असल्याचा आरोप करण्यात आला आहे.

बदली प्रक्रियेमध्ये नागरी सेवा मंडळांतर्गत मानवी दृष्टिकोन, कार्यालयाची आवश्यकता आणि अधिका?यांची सोय असा विचार करून बदलीची शिफारस केली जाते. मात्र, ऑनलाइन बदली प्रक्रियेत कुठेही नागरी सेवा मंडळाला स्थान दिसून येत नाही.

तात्पुरत्या मोटार निरीक्षकांच्या यादीचा बदलीसाठी वापर २०२५ ची सेवाज्येष्ठता यादीऐवजी २०२४ तात्पुरत्या मोटार निरीक्षकांच्या यादीचा बदलीसाठी वापर

२०२३ मध्ये १५६ मोटार वाहन निरीक्षकांच्या ऑनलाइन बदल्या

वर्ष २०२३ मध्ये १५६ मोटार वाहन निरीक्षकांच्या ऑनलाइन बदल्या झाल्या. त्यानंतर अनेकांनी विनंती बदलीसाठी अर्ज केले होते. नापसंतीच्या आणि कुटुंबाच्या दृष्टीने चुकीच्या ठिकाणी बदली झाली म्हणून तब्बल ८७ अधिकाऱ्यांनी विनंती अर्ज केले होते. तर यावर्षी ऑनलाइन बदल्यामुळे घोळ होईल, असे वाटत असल्याने सुमारे ७० लोकांनी विनंती बदलीसाठी अर्ज केल्याचे परिवहन विभागातील एका वरिष्ठ नेत्यांनी सांगितले.

निरीक्षक पदाच्या गटाचा घोळ असताना बदली अधिनियम २००५ किंवा समुपदेशन धोरण २०१८ ने करण्यास संभ्रम पसरला असल्याची स्थिती आहे . ऑनलाइन बदली फक्त सहायक आणि मोटार वाहन निरिक्षक या दोनच संवर्गांना बंधनकारक कसे, इतर संवर्गात अधिकाऱ्यांना बंधन नाही. बदलीच्या शेवटच्या क्रमांकावर असलेल्या अधिकाऱ्यांना विकल्प/संधी राहणार नाही.

**इच्छित अधिकारी राहतात वंचित**

राज्यातील मोटार वाहन निरीक्षकांवर ऑनलाइन बदली प्रक्रियेमध्ये न्याय मिळत नाही. सुरुवातीच्या काहींनाच इच्छित ठिकाण मिळते. मात्र, इतर महिला अधिकारी, दुर्धर आजार किंवा कौटुंबिक अडचणी असणारे अधिकारी मात्र इच्छित ठिकाणी बदलीपासून वंचित राहतात. त्यामुळे प्रचलित पद्धतीप्रमाणेच बदली प्रक्रिया राबवावी यासाठी शासनाला विनंती केली आहे.

**भूषण राऊत, राज्य सचिव**
**कार्यकारी अधिकारी संघटना**

**एकही तक्रार आली नाही**

माझ्याकडे अद्याप एकही तक्रारी प्राप्त झाली नाही. यापूर्वी झालेल्या ऑनलाइन बदलीमध्ये ९२ टक्के अधिकाऱ्यांना इच्छित पोस्टिंग मिळाली. त्यामुळे सध्यातरी शासन बदलाचे धोरण ऑनलाइन असल्याने आम्ही ऑनलाइन प्रक्रिया राबवत आहे. त्यामध्ये बदली प्रक्रियेच्या निकषांमध्ये सुधारणा करणार आहे. गंभीर आजार गृहीत धरणार त्यांचे कागदपत्रे तपासल्याने जाणार आहे.

**विवेक भीमनवार, आयुक्त**
**परिवहन विभाग**

# राजकीय आरोप करणे लज्जास्पद

■ **महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. १० :** भारत पाकिस्तान यांच्यातील युद्धजन्य परिस्थिती दरम्यान काँग्रेस पक्षाने केंद्रातील नरेंद्र मोदी सरकारवर टीका केली आहे. आयएमएफच्या माध्यमातून पाकिस्तानला कर्ज मिळणार आहे. यावरून काँग्रेसने मोदी सरकारवर निशाणा साधला आहे. त्याला आता भारतीय जनता पक्षाचे नेते केशव उपाध्ये यांनी प्रत्युत्तर दिले आहे.

देशातील युद्धाच्या स्थिती असताना अशा काळात सरकारवर राजकीय वातावरण तयार करण्यासाठी आरोप करणे हे लज्जास्पद असल्याचे केशव उपाध्ये यांनी म्हटले आहे.

काँग्रेसच्या या फालतू टीकेकडे बघण्याची वेळ नाही. देश एकीकडे युद्ध लढत असताना सरकारच्या पाठीमागे ठाम उभे राहण्याचे सोडून काँग्रेस राजकारण करत आहे. ही राजकीय टीकेची वेळ नाही, एवढे भान काँग्रेस पक्षाला कधी येणार? असा प्रश्न देखील त्यांनी उपस्थित केला आहे.

केशव उपाध्ये म्हणाले की, आयएमएफ ने पाकिस्तानला बेल आउट पॅकेज जाहीर केलं असून त्यांना १.३ अमेरिकन बिलियन डॉलरचे कर्ज मिळणार आहे. पण काँग्रेसला आयएफएममधील नियम माहीत असायला हवेत. त्यांनी भान बाळगायला हवे.

# एसटीच्या महामंडळाच्या ताफ्यात पर्यावरणपूरक नव्या बसेस

■ **महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. १० :** महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या (एसटी) ताफ्यात लवकरच पर्यावरणपूरक आणि इंधन खर्चात बचत करणाऱ्या हायब्रीड इंधनावर चालणाऱ्या बसगाड्यांचा समावेश होणार आहे.

**२५ हजार बस खरेदीचा आराखडा**




परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी ही महत्त्वाची माहिती दिली आहे. पुढील पाच वर्षांत एसटी महामंडळ दरवर्षी ५,००० या प्रमाणे एकूण २५,००० नव्या बसेस खरेदी करणार आहे. त्यातील पहिल्या ५,००० बसेस चालू आर्थिक वर्षात घेतल्या जातील, तर २०२५-२६ पासून उर्वरित २०,००० बसेस डिझेलसह सीएनजी व एलएनजी या पर्यायी इंधनांवर चालणाऱ्या हायब्रीड प्रकारात असतील. डिझेलचा वापर केवळ आपत्कालीन परिस्थितीतच केला जाईल, जेणेकरून प्रवाशांना कोणतीही गैरसोय होणार नाही, असेही त्यांनी स्पष्ट केले.

सध्या एसटीच्या बहुतांश बसेस डिझेलवर चालतात आणि महामंडळाच्या एकूण खर्चापैकी तब्बल ३४% खर्च हा इंधनावर होतो. दररोज १०.७ लाख लिटर डिझेल लागते, तर वार्षिक खर्च सुमारे ३४,००० कोटी रुपयांपर्यंत पोहोचतो. यामुळे पर्यायी इंधनाचा पर्याय अधिक प्रभावी ठरत आहे.

सीएनजी व एलएनजी हे इंधन प्रकार डिझेलपेक्षा स्वस्त असून अधिक कार्यक्षम व पर्यावरणपूरक आहेत. एलएनजी वर बस प्रतिलीटर ५.५ किमी तर डिझेलवर केवळ ४ किमी अंतर पार करते. महामंडळाने किंग्ज गॅस प्रायव्हेट लिमिटेड या कंपनीसोबत केलेल्या करारानुसार, एलएनजी हे डिझेलपेक्षा २०% स्वस्त दरात मिळणार आहे, ज्यामुळे दरवर्षी सुमारे २३५ कोटी रुपयांची बचत होणार आहे.

राज्यभरात ९० एलएनजी पंप आणि महानगर गॅस प्रायव्हेट लिमिटेड मार्फत २० सीएनजी पंप उभारण्यात येणार आहेत. त्यामुळे इंधनाचा पुरवठा सुनिश्चित होईल. या अनुषंगाने, हायब्रीड तंत्रज्ञानावर आधारित बसगाड्यांचे प्रस्ताव विविध बस उत्पादक कंपन्यांकडून मागवले गेले आहेत.

# सुप्रसिद्ध मेकअप आर्टिस्ट विक्रम गायकवाड यांचे निधन



■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १० :** सुप्रसिद्ध मेकअप आर्टिस्ट विक्रम गायकवाड यांचे मुंबईत निधन झाले आहे. ते ६१ वर्षांचे होते. त्यांच्या निधनामुळे सिनेसृष्टीला मोठा धक्का बसला आहे.

विक्रम गायकवाड यांनी काशीनाथ घाणेकर, बालगंधर्व, ठग्ज ऑफ हिंदुस्तान, शहीद भगतसिंह ते जाणता राजा अशा विविध पात्रांची रंगभूषा केली आहे. शनिवारी दुपारी दादरच्या शिवाजी पार्क स्मशानभूमीत त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले.

विक्रम गायकवाड यांनी पानिपत, बेल बॉटम, उरी, डर्टी ब्लॅकमेल, दंगल, पीके, झांशी, सुपर ३०, केदारनाथ अशा अनेक सिनेमात त्यांनी मेकअप आर्टिस्ट म्हणून आपला ठसा उमटवला आहे.

पावनखिंड , फत्ते शिकस्त, शेर शिवराज अशा ऐतिहासिक मालिकांमध्ये देखील त्यांनी रंगभूषाकार म्हणून उत्तम जबाबदारी निभावली होती. विक्रम गायकवाड यांना सात वेळा राष्ट्रीय पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. दंगल, संजू, थ्री इडियट्स, भाग मिल्खा भाग, पानिपत अशा शेकडो सिनेमांचे मेकअप डिझायनर ते होते.

# बांगलादेशी महिलेला कोर्टाने दिला जामीन

■ **महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. १० :** अटकेनंतर २४ तासांच्या आत कोर्टापुढे हजर करण्यात अपयश आल्यामुळे मुंबई उच्च न्यायालयाने एका बांगलादेशी महिलेला जामीन दिला आहे.

प्रस्तुत प्रकरणात कायदा व संविधानात नमूद तरतुदींचे स्पष्ट उल्लंघन झाल्याचा ठपका कोर्टाने या प्रकरणी पोलिसांवर ठेवला आहे. यासंबंधीच्या माहितीनुसार, शबनम सुलेमान अंसारी असे या प्रकरणातील बांगलादेशी महिलेचे नाव आहे. भारतात अवैधपणे प्रवेश केल्याप्रकरणी गत जानेवारी महिन्यात तिला तिच्या दीड वर्षांच्या मुलास अटक करण्यात आली होती.

तिच्यावर पासपोर्ट कायदा व परदेशी नागरिक अधियमांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला होता. पण पोलिसांना काही कारणास्तव २४ तासांच्या आत तिला कोर्टात हजर करता आले नाही. त्यामुळे कोर्टाने तिला जामीन मंजूर केला. कायदा अंमलबजावणी यंत्रणेला सदर महिलेला २४ तासांच्या आत कोर्टात हजर करता आले नाही. हे कायदा व तिच्या मुलभूत अधिकारांचे स्पष्ट उल्लंघन आहे, असे न्यायमूर्ती मिलिंद जाधव यांनी म्हटले आहे.

पोलिसांनी अटक केल्यानंतरही महिलेला नियमांकडे दुर्लक्ष करत कोर्टात हजर केले नाही. ही दुर्दैवी गोष्ट आहे. हे आर्टिकल २१ व २२ चे उल्लंघन आहे. हेच कारण महिलेला जामीन देण्याचे मुख्य कारण आहे, असेही कोर्टाने या प्रकरणी आपले निरिक्षण नोंदवले.

# टिप्परची दुचाकीला धडक दोन नातवंडाचा जागीच मृत्यू



आजी,आजोबा गंभीर जखमी, जमावाने टिप्पर पेटवला

■ **महासागर प्रतिनिधी बुलढाणा, दि. १० :** गौण खनिजाची वाहतूक करणाऱ्या टिप्परने दुचाकीला धडक दिली. या अपघातात दोन नातवंडाचा मृत्यू झाला असून, आजी-आजोबा गंभीर जखमी झालेत. या वेळी संतप्त झालेल्या ग्रामस्थांनी टिप्परला आग लावून ते पेटवून दिले. ही घटना भेंडवळ जवळील माऊली फाट्यावर घडली.

जळगाव जामोद तालुक्यातील पळशी सुपो येथील प्रकाश महादेव खेडकर, साधना प्रकाश खेडकर हे दाम्पत्य दोन नातवांसह दुचाकीने शेगावकडे जात होते. भेंडवळ जवळील माऊली फाट्याजवळ येताच त्यांच्या दुचाकीला मागाहून येणाऱ्या टिप्परने धडक दिली.

या अपघातात दोन्ही नातवंड पार्थ चोपडे (वय ६), रा. राजापेठ, अमरावती आणि युवराज मोहन भागवत (वय ५), रा. बडनेरा यांच्या डोक्यावरुन टिप्परचे चाक गेल्याने त्यांचा जागीच मृत्यू झाला, तर आजी- आजोबा गंभीर जखमी झाले आहेत. अपघात घडताच संतप्त ग्रामस्थांनी घटनास्थळी धाव घेत टिप्परला आग लावली.

आगीचे लोळ, धुराचे लोट उठल्यामुळे परिसरात खळबळ उडाली होती. अपघाताची माहिती मिळताच येथील ठाणेदार व पोलिस कर्मचारी पालिकेचे अग्निशमन दल घेऊन घटनास्थळी दाखल झाले. या वेळी खामगाव अपर पोलिस अधीक्षक श्रेणिक लोढा यांनी घटनास्थळाची पाहणी करुन पोलिस कर्मचाऱ्यांना मार्गदर्शन केले.

परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी पोलिस बंदोबस्त तैनात केला. टिप्पर चालकाच्या निष्काळजीपणाने दोन बालकांचा मृत्यू झाला. संतप्त जमावामुळे घटनास्थळी तणाव निर्माण झाला होता. गौण खनिजाची वाहतूक करणारे टिप्पर हे राजकिय पक्षाच्या पदाधिका?याचे असल्याची माहिती आहे. पोलिसांनी फरार चालकास अटक केली. सचिन पुंडकर रा. पिंप्री देशमुख ता. खामगाव असे आरोपी चालकाचे नाव आहे. तपास पोलिस उपनिरिक्षक स्नेहा शेडगे करीत आहेत.

# भाजप महिला मोर्चाकडून महाराणा प्रताप जयंती साजरी



■ **महासागर प्रतिनिधी धारणी / अमरावती, दि. १० :** मेवाडचे राजे हिंदूसूर्य महाराणा प्रताप यांची जयंती धारणी भारतीय जनता पार्टी महिला मोर्चा अध्यक्ष सौ. दुगार्ताई बिसंदरे यांच्या निवासस्थानी साजरी करण्यात आली.

यावेळी चिखलदरा भाजपा महिला अध्यक्ष सौ. सारिका पाटणकर, धारणी महिला महासचिव अनिता भिलावेकर, देवकन्या देवपाल यांच्यासह उध्दव देवापाल, राजेश भिलावेकर उपस्थित होते. महाराणा प्रताप यांच्या शौर्याचा आणि पराक्रमाचा गौरव केला जातो, तसेच त्यांच्या त्याग आणि देशभक्तीचे स्मरण केले जाते. महाराणा प्रताप हे सिसोदिया कुळातील क्षत्रिय राजपूत राजे होते, मेवाडच शक्तीशाली राजा म्हणून त्यांची ओळख होती.

महाराणा प्रताप यांना लहानपनापासूनच राजवाड्या पेक्षा, सामान्य जनतेबरोबर वेळ घालायला जास्त आवडत असे. त्यांच्या जनते मध्ये भिल्ल समुदाय जास्त प्रमाणात होता. त्यामुळे अर्थातच त्यांच्या सवंगड्यांमधेही भिल्ल मुले खुप होती. त्यांनी स्वतःबरोबरच आपल्या सवंगड्यांणाही सशत्र युद्धचे धडे दिल. भिल्ल आपल्या मुलाला किका असे संबोधतात. म्हणून ज्येष्ठ भिल्ल, महाराणाला किका नावाने हाक मारत असत. यावरून आपल्याला महाराणा बद्दल सामान्य लोकांच्या मनात किती आदर आणि प्रेम होता हे कळते. आपल्या मातृभूमीसाठी विशेष योगदान दिले .

# २६ ला शितला माता मंदिरात शनिदेव जयंती व नवग्रह उत्सवाचे आयोजन

**महासागर प्रतिनिधी**

**भंडारा :** खांबतलाव परिसरात असलेल्या श्री आदिशक्ती शितला माता मंदिर येथे शनिदेव जयंती व नवग्रह उत्सवाचे आयोजन सोमवार दिनांक २६ मे २०२५ ला सायंकाळी ४ वाजता मोठ्या उत्साहात करण्यात येणार आहे. त्या निमित्ताने सोमवार दिनांक २६ मे २०२५ दुपारी ४ वाजता अभिषेक व सायंकाळी ६ वाजता आरती तसेच ७ वाजता मंदिराच्या प्रागणात महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. तरी भाविक भक्तांनी जास्तीत जास्त संख्येनी उपस्थित राहुन महाप्रसादाचा लाभ घ्यावा असे आवाहन श्री आदिशक्ती शितला माता मंदिर देवस्थानचे अध्यक्ष ईश्वरलाल काबरा, सचिव सत्यनारायण व्यास, कोषाध्यक्ष धनराज धुर्वे व संचालक मंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी केले आहे.

## जात प्रमाणपत्र पडताळणी समितीनी दर आठवडयात मंगळवार व गुरुवारला त्रुटी पूर्तता शिबीर

**भंडारा:** १०० दिवसांच्या कृती आराखडया अंतर्गत जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती विविध कार्यक्रम राबविणार १०० दिवसांच्या कृती आराखडया अंतर्गत जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती विविध विविध मोहिम राबवूणप्रलंबीत प्रकरणे निकाली काढणार आहे. यात त्रूटी पूर्ततेसाठी प्रलंबीत असलेली प्रकरणे जलद गतीने निकाली काढण्यासाठी दर आठवडयात मंगळवार व गुरुवार ला त्रुटी पूर्तता शिबीर सकाळी १०.०० सायंकाळी ५.०० वाजता पर्यंत आयोजीत करण्यात येणार आहे. त्यामुळे अर्जदारांनी त्रुटीची पूर्तता करताच प्रकरण निकाली काढणार असून त्यामध्ये जात प्रमाणपत्र पडताळणी अर्ज कसा भरावा, अर्जासोबत कोण-कोणती कागदपत्रे जोडावी, याबाबत मार्गदर्शन करण्यासाठी वेबीनारचे आयोजन करण्यात येणार आहे. तरी विशेष मोहिमेत जास्तीत जास्त विद्यार्थी पालक अर्जदार यांनी सहभागी व्हावे असे आव्हान उपायुक्त तथा सदस्य, जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती, भंडारा यांनी कळविले आहे.

# तुमसर बाजार समिती विभाजनासाठी उच्च न्यायालयाचे दार ठोठावणार !

*** माजी सरपंच सदाशिव ढेंगे यांचा इशारा * 'विभाजनाच्या निर्णयाला विरोध नाही; पण राजकीय हस्तक्षेप सहन करणार नाही' - ठाम भूमिका**

**महासागर प्रतिनिधी**

**तुमसर , दि.१० मे :** ३८ वर्षांपासून कार्यरत असलेल्या तुमसर कृषी उत्पन्न बाजार समितीचा विभाजनाचा निर्णय शासनाने घेतल्यानंतर मोहाडी येथे स्वतंत्र बाजार समिती स्थापन होणार असल्याचे स्पष्ट झाले आहे. मात्र या प्रक्रियेत राजकीय हस्तक्षेप होत असल्याचा आरोप माजी सरपंच सदाशिव ढेंगे यांनी केला असून, त्यांनी या निर्णयाविरोधात उच्च न्यायालयाचे दार ठोठावणार असुन या संबधी लवकरच याचीका दाखल करणार असल्याचे दैनिक महासागर च्या प्रतिनिधी सोबत बोलतांना सांगितले.

राज्य शासनाने १७ एप्रिल २०२५ रोजी परिपत्रक काढून मोहाडीला स्वतंत्र बाजार समिती मंजूर केली आहे. मुख्यमंत्री बाजार समिती योजना व 'एक तालुका – एक बाजार समिती' धोरणांतर्गत हा निर्णय घेतला गेला आहे.

***'विभाजनाला विरोध नाही; पण राजकीय हस्तक्षेप सहन करणार नाही' - ढेंगे***

माजी सरपंच सदाशिव ढेंगे म्हणाले, 'शेतकऱ्यांच्या सोयीसाठी विभाजन आवश्यक आहे; त्यामुळे विभाजनाच्या निर्णयाला आम्ही विरोध करत नाही. मात्र या प्रक्रियेत काही राजकीय नेत्यांनी अनावश्यक हस्तक्षेप सुरू केला आहे. शेतकऱ्यांच्या हिताला बाधा पोहोचणाऱ्या कोणत्याही गोष्टीला आम्ही विरोध करू.'त्यांनी स्पष्ट केले, 'जर ही प्रक्रिया पारदर्शक रितीने



झाली नाही, राजकीय दबावाखाली निर्णय घेतले गेले, तर मी उच्च न्यायालयाचा दरवाजा ठोठावणार आहे. यापूर्वीही बाजार समितीच्या निवडणुकीसाठी मी न्यायालयात गेलो होतो; आता सुद्धा शेतकऱ्यांच्या हक्कांसाठी लढायला तयार आहे. असे दैनिक देशोन्नती प्रतिनिधी सोबत बोलतांना सांगितले.

***शेतकऱ्यांच्या हक्कांची लढाई स्थानिक पाठिंबा वाढतोय***

ढेंगे यांच्या भूमिकेला स्थानिक शेतकरी, व्यापारी, हमाल, मापारी वर्गाचा पाठिंबा मिळत आहे. त्यांचे म्हणणे आहे, 'विभाजनामुळे आम्हाला जवळच बाजारपेठ उपलब्ध होईल, वाहतूक खर्च व वेळ वाचेल. पण ही प्रक्रिया शेतकऱ्यांच्या हिताची व पारदर्शक असली पाहिजे.'

***राजकीय हालचालींना वेग***

या निणऱ्याच्या पार्श्वभूमीवर स्थानिक राजकीय पक्षांत हालचाली सुरू झाल्या आहेत. नव्या बाजार समितीच्या निवडणुका डोळ्यासमोर ठेवून विविध गटांमध्ये वर्चस्वाची चढाओढ सुरू असल्याचे चित्र आहे.आमदार राजू कारेमोरे यांनी या निणऱ्याचे स्वागत करताना सांगितले, 'हा निणऱ्य ग्रामीण भागाच्या विकासासाठी महत्त्वाचा आहे. शेतकऱ्यांच्या हिताची बाजार समिती लवकरात लवकर कार्यान्वित व्हावी, हीच अपेक्षा आहे.'

***पुढील काळ निर्णायक ठरणार***

राज्य शासनाच्या परिपत्रकानंतर विभाजनाची प्रक्रिया सुरू झाली आहे; मात्र ढेंगे यांच्या न्यायालयीन लढाईच्या तयारीमुळे या निर्णयाला कायदेशीर अडथळा येण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

राजकीय हस्तक्षेप थांबतो का, प्रक्रिया पारदर्शक राहते का, आणि शेतकऱ्यांचे हित सुरक्षित राहते का हे येत्या काळात स्पष्ट होईल.

# भरधाव ट्रकने दुचाकीला दिली धडक, एकाला चिरडले, दुसरा गंभीर जखमी

## साकोली येथील उड्डाण पुलाजवळील घटना

**महासागर प्रतिनिधी**

**साकोली , दि.१० मे :** पेट्रोल पंपावर पेट्रोल भरून या आपल्या गावी दुचाकीने परत जात असणाऱ्या दुचाकीस्वारांना विरुद्ध दिशेने येणाऱ्या ट्रकने जोरदार धडक दिली. यात एकाला अक्षरशः चिरडले गेले तर, दुसरा गंभीर जखमी झाला. ही घटना साकोली राष्ट्रीय महामार्गावर शुक्रवारी दुपारी ४ वाजता घडली. अपघातानंतर ट्रक पसार झाला.

मृताचे नाव सुभाष धनीराम भाजीपाले (४२) असे असून धनराज कापगते (५५) असे जखमीचे नाव आहे.

हे दोघेही परसोडी गावातील रहिवासी आहेत. हे दोघेही शुक्रवारी दुपारी आपल्या गावावरून साकोली येथे काही कामानिमित्त मोटारसायकलने (एमएच ३६ / सी ४९०२) आले होते. काम आटोपल्यावर गावी परतण्याआधी त्यांनी मोदी पेट्रोल पंप येथून पेट्रोल भरले. त्यानंतर ते गावी जाण्यासाठी निघाले असता मुंबई- कोलकाता राष्ट्रीय महामार्गावरील श्रीराम भात गिरणी समोर दोन ट्रक अपघातग्रस्त झाले त्यात मृत व जखमी चिरडले गेले.

***अनेकांना आली घेरी***

घटनास्थळावरील दृश्य पाहण्याजोगे नव्हते. सुभाष भाजीपाले यांना चिरडल्याने घटनास्थळी रक्ताचा सडा पडलेला होता. हे दृश्य पाहून अनेकांना घेरी आली.

दुचाकीचीही मोठ्या प्रमाणावर मोडतोड झालेली होती. अपघातानंतर नागपूरच्या दिशेने



पसार झालेल्या ट्रकचा शोध पोलिस घेत आहेत.

ट्रकने मोटारसायकलला जोरदार धडक दिली. यात सुभाष भाजीपाले जागीच ठार झाला. सुभाष भाजीपाले यांना चिरडल्याने त्यांचा काही वेळातच मृत्यू झाला. जखमी धनराज कापगते यांना नागरिकांनी आणि पोलिसांनी स्थानिक खासगी रुग्णालयात पोहोचविले.

# उन्हाळी धान पिकाच्या खसऱ्या अभावी शेतकरी विवंचनेत

## ई पीक मधील तांत्रिक अडचण दूर करण्याची मागणी

**महासागर प्रतिनिधी**

**सानगडी , दि.१० मे :** सासरा तलाठी साझ्यामध्ये उन्हाळी धानपिकाची लागवड केलेले शेतकरी शेकडोंच्या संख्येत आहेत. सर्वांनी महसूल विभागाच्या सूचनेनुसार ई पीक ॲपवरून खसऱ्याची नोंद केली. संबंधित शेतकऱ्यांच्या ई पीक ॲप वरील नोंदी मोबाईलवर दिसत आहेत. पुन्हा नोंद करण्याचा प्रयत्न करतात तेव्हा जागा शिल्लक नसल्याची सूचना येत आहे .

या नोंदीना अद्यावत करण्याचे अधिकार तलाठ्यांना दिले आहेत. आता सगळीकडे आधारभूत केंद्रावर नोंदणी सुरु झालेली आहे.

शेतकरी जेव्हा संबंधित तलाठ्यांकडे उन्हाळी धानपिकाची नोंद असलेल्या सातबारा या दस्ता ऐवजाची मागणी करतात तेव्हा सर्वांनाच आपल्या पिकाचे ई पीक नोंद झाली नाही असे उत्तर मिळते. याचे कारण विचारतात तेव्हा तलाठी या विषयाकडे कानाडोळा करत असल्याचे दिसून येत आहेत .

त्या पुन्हा नोंदी घ्यायला सांगत आहेत.शेतकऱ्यांना थातुरमातूर उत्तरे मिळत आहेत.सासरा येथे महिला तलाठी असून त्या पाहिजे तस्या अनुभवी नाहीत असे बोलले जात आहे.

परिणामी शेतकऱ्यांची ही समस्या गंभीर रूप धारण करत आहे. येथील तलाठी अनुभवशून्य असल्याने शेतकऱ्यांची ही समस्या सुटेल की नाही अशी संभ्रमावस्था निर्माण झाली आहे.त्यांचेकडून या समस्याचे निराकरण होत नसल्याने शेतकरी विवंचनेत अडकल्याचे दिसून येत आहेत . सातबारा नसल्याने शेतकऱ्यांच्या आधारभूत केंद्रावर नोंदी घेता येत नाहीत . महसूल विभागाने ई पीक मधील तांत्रिक अडचण दूर करून ही समस्या लवकरात लवकर सोडवावी ही सासरा व परिसरातील शेतकऱ्यांची मागणी आहे.

# इंडियन रेडक्रॉस सोसायटी जिल्हा शाखा भंडारा तर्फे रेड क्रॉस दिवस साजरा

**महासागर प्रतिनिधी**

**भंडारा , दि.१० मे :** मा. नानाभाऊ पटोले आमदार साकोली यांच्या मातोश्री , जिल्हा बँकेचे कर्मचारी मा.सुनील फुंडे यांच्या मातोश्री यांचे सह ऑडनस फॅक्टरी भंडारा येथील व पहलगाम कश्मीर येथील मृतात्म्यांना भावपूर्ण श्रद्धांजली, १२५ व्या रेड क्रॉस संदेशाचे आगामी प्रकाशनाची भव्य तयारी, फायर सेफ्टी लिटरसी चे आयोजना बाबत सर्वांची सहमती ) इंडियन रेड क्रॉस सोसायटी जिल्हा कार्यालय तुरसकर नर्सिंग होम भंडारा येथे ८ मे जागतिक रेडक्रॉस दिवस साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी चेअरमन डॉ. अशोकराव ब्राहमणकर, डॉ. चंद्रमोहन गुप्ता उपाध्यक्ष, डॉ. नितीन तुरसकर सेक्रेटरी हे होते.



दुसऱ्या महायुद्धाच्या वेळी न्यूयॉर्क येथील जेन हेंनरी डुआन्ट व यांच्या सहकार्यांनी जागतिक स्तरावर रक्तपात होऊ नये, मानवीय शांतता राखावी व माणसाने माणसाच्या सुख -दुखात मानवतेने सहभाग घ्यावा, आपत्कालीन परिस्थितीत मानवीय मदत करता यावी या हेतूने जागतिक रेड क्रॉस ची ८ मे रोजी स्थापना करण्यात आली. त्या अनुषंगाने १८३ वा जागतिक रेड क्रॉस दिवस साजरा करण्यात आला आला. त्यानिमित्त जिल्हा शाखा भंडाराचे संस्थापक स्वर्गीय डॉ. एल. डी. गिरी-पुंजे यांची हृदय आठवण करून त्या-चे नावाची रेड क्रॉस तर्फे लावण्यात आलेल्या उन्हाळी पानपोईला डॉ. ब्राह्मणकर, डॉ.गुप्ता, मीरा भट, राजू खवसकर यांनी भेट दिली.

रेड क्रॉस दिवसानिमित्त आ.नानाभाऊ पटोले यांच्या मातोश्री, सुनील जी पुंडे यांच्या यांचे सह ऑर्डनन्स फॅक्टरी भंडारा येथील व पहलगाम काश्मीर येथील मृतात्म्यांना सामूहिक भावपूर्ण श्रद्धांजली वाहण्यात आली.

इंडियन रेड क्रॉस सोसायटी जिल्हा शाखा भंडारा तर्फे मानवीय हिताच्या कार्यांचे अवलोकन करून भंडारा जिल्ह्यातील सर्वांगीण इतिहासाची गाथा ( सामाजिक, शैक्षणिक, धार्मिक, ऐतिहासिक यांचे सह रेड क्रॉस च्या कार्याची गाथा) १२५ व्या महापुस्तकातून रेडक्रॉस तर्फे प्रकाशित करण्याचा ठराव बहुमताने पारित करण्यात आला. तसेच आपत्कालीन स्थितीमध्ये सामान्य नागरिकांनी कोणत्या बाबींची सतर्कता घेऊन प्रसंगावधानानुसार आपत्तीत सापडलेल्यांचे जीव वाचवता येईल या हेतूने फायर सेफ्टी लिटरसी चे आयोजन लवकरच करण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले. याप्रसंगी डॉ.जयंता गिरी-पुंजे, दीपक व्यवहारे आजीवन जेष्ठ सदस्य, समाजसेविका मीराभट्ट, साहित्यिक राजूभाऊ खवसकर, हेमंत चंदवासकर , रक्तरत्न प्रीतम कुमार राजाभोज यांचे सह रवीसंकर साकोरे, रत्नेश कोहरु, नरेंद्र साकोरे उपस्थित होते. प्रस्ताविक डॉ. चंद्रमोहन गुप्ता आभार प्रीतम कुमार राजाभोज यांनी केले.

# तेंदूपत्ता संकलनसाठी जाणाऱ्या सर्व ग्रामवासियांसाठी कांद्री वनविभागाकडून जनजागृती

**महासागर प्रतिनिधी**

**जांब (लोहारा ) , दि.१० मे :** उपवनसंरक्षक भंडारा वन विभाग भंडारा व सहाय्यक वनसंरक्षक उप विभाग तुमसर यांचे मार्गदर्शनाथ वनपरिक्षेत्र अधिकारी जांबकांद्री अपेक्षा शेन्डे द्वारे तेंदू पत्ता संकलन हंगाम सन २०२५ च्या अनुषंगाने मोहाडी व तुमसर तालुक्यातील तेंदू पत्ता संकलनसाठी जाणाऱ्या सर्व ग्राम वासियांना जाहीर आंवाहन करण्यात येत आहे .

वनपरीक्षेत्र जांबकांद्री अंतर्गत येणाऱ्या तुमसर व मोहाडी तालुक्यातील मंगरली, पिटेसूर, देऊळगाव, सोरणा, गायमुख, सालई व सिहरी या गावांच्या लगत वन्यप्राणी वाघ व बिबट येण्याचे प्रमाण मागील काही महिन्यापासून वाढले आहे. अशा परिस्थितीत तेंदुपत्ता संकलन हंगाम २०२५ दरम्यान मानव वन्यजीव संघर्ष टाळण्याकरिता जन सहभाग व जन जागृती अत्यावश्यक आहे.

यासाठी वनपरिक्षेत्र कार्यालय जांबकांद्री द्वारे जनजागृती कार्यक्रम राबविण्यात येत आहे.

वन कर्मचाऱ्याद्वारे तेंदू फळी व ग्रामपंचायत यांना भेटी देऊन तेंदू पाने संकलन दरम्यान सुरक्षिततेच्या दृष्टीने कार्यवाही बाबत गावकऱ्यानां खालीलप्रमाणे सूचित करण्यात येत आहे

१) जंगलात एकट्याने जाऊ नये जातांना मोठ मोठयाने आवाज करत किवां मोबाईल वर मोठयाने गाणे वाजवत जावे.

२) दिवस उजळणे पूर्वी व दिवस मावळल्यावर जंगलात थांबू नये.

३) संकलनसाठी जातांना लहान मुले व वयोवृद्ध सोबत नेऊ नये, ज्याठिकाणी वन्यप्राण्याचां वावर नियमित आहे व तसे वनक्रर्मचाऱ्या द्वारे सूचित करण्यात आले आहे अश्या ठिकाणी कुठल्याही परिस्थितीत जाऊ नये. सर्व ग्रामवासीयांनी आपल्या सुरक्षीततेची काळजी घ्यावी व वनविभागास भंडारा यांना मानव वन्यजीव संघर्ष टाळण्याकरिता सहकार्य करावे.

# वरठी येथे सीसीटीव्ही कॅमेरे लागणार तरी कधी ?

**मोहाडी :** गाव सुरक्षेच्या दृष्टीने शहरात किंवा ग्रामीण भागात वाढत्या चोरीच्या घटनांवर आळा बसावा, कुठेही अनुचित प्रकार घडू नये तसेच अशा घटनांना प्रतिबंध लागावा या उद्देशाने गावात सीसीटीव्ही कॅमेरे लावले जातात. परंतु मोहाडी तालुक्यातील सर्वात मोठ्या वरठी गावात अद्याप पर्यंत सीसीटीव्ही कॅमेरे लागले नसल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. वरठी हे गाव लोकसंख्या, क्षेत्रफळाच्या दृष्टीने खूप मोठे गाव असून पंधरा हजाराच्या वर लोकसंख्या गावात वास्तव्य करत आहे. १७ सदस्य व १ सरपंच अशी ग्रामपंचायत आहे गावात रेल्वे स्टेशन, पोलीस स्टेशन, सनफ्लॅग कारखाना देखील आहे. जिल्ह्यातील एकमेव रेल्वे स्टेशन असल्या कारणाने या गावाला भंडारा रोड या नावाने सुद्धा ओळखले जाते. गावातून दररोज दहा हजार लोक प्रवास करीत असतात. परंतु एखादा अनुचित प्रकार घडल्यास ते बघण्यासाठी गावात सीसीटीव्ही कॅमेरे नाहीत. ग्रामपंचायत कार्यालयाला या अगोदर निवेदन दिले आहे , परंतु अजून पर्यंत ग्रामपंचायतीने कसल्याही प्रकारची दखल घेतली नाही. त्यामुळे गावातील नागरिकांमध्ये भितीचे वातावरण निर्माण झाले आहे. ग्रामपंचायत प्रशासनाने याकडे लक्ष देऊन लवकरात लवकर सीसीटीव्ही कॅमेरे लावावे अशी मागणी सामाजिक कार्यकर्ता तारीकराम रामटेके यांनी केली आहे.

# नाल्यात तुंबल्या ; आरोग्य आले धोक्यात गावात दुर्गंधी



**महासागर प्रतिनिधी**

**मोहाडी , दि.१० मे :** तालुक्यातील धुसाळा येथील सांडपाणी वाहुन नेणाऱ्या नाल्या तुंबल्याने सांडपाणी रस्त्यावर येऊन गावभर दुर्गंध पसरत आहे. गावातील वार्ड क्र. २ मधील वसाहतीत गेल्या काही वर्षांपासून नाल्यातील गाळाचा उपसा करण्यात आलेला नाही. त्यामुळे सांडपाणी वाहून जाण्याचा अडथळा निर्माण होत आहे. याशिवाय माती व केरकचऱ्याने नाल्या पूर्णतः गाळाने तुंबल्या आहेत. त्यामुळे डासांची पैदास मोठ्या प्रमाणात वाढत आहे.

स्वच्छतेसाठी ग्रामपंचायतला मिळणारा विशेष निधी जातो कुठे? असा सवाल नागरिक उपस्थित करीत आहेत. धुसाळा येथील वार्ड क्र. २ मध्ये नाल्यातील गाळाचा उपसा वर्षभर होत नसल्याने नाल्यामध्ये मातीचे थर, प्लास्टिकच्या पिशव्या, केरकचरा मोठ्या प्रमाणात साचला आहे. नाल्या पूर्णपणे तुंबून भरलेल्या आहेत. या परिसरातील नागरिकांच्या घराजवळ नाल्या फुटल्याने सांडपाण्याचे मोठे डबके तयार झाले आहेत. येथील गाळ उपसा करण्याकडे ग्रामपंचायत प्रशासनाचे अक्षरशः दुर्लक्ष आहे.

वर्षभर नालीसफाई करण्याकडे दुर्लक्ष केल्याने बुजलेल्या नाल्यांमध्ये माती कचऱ्यांचे थर जमा होऊन खराब सांडपाणी जागेवरच थांबून दुर्गंधी पसरत आहे. सध्या स्थितीत नाल्यांची अवस्था बिकट स्वरूपाची झाली आहे. गाळाच्या उपस्या अभावी सांडपाणी एकाच ठिकाणी जमा होऊन डास, किळे व जंतू तयार होत आहेत. त्यामुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. गावातील नागरिकांच्या आरोग्याशी खेळ सुरू असून ग्रामपंचायतीचा स्वच्छतेवर भर नाही तर गलिच्छ वर भर दिसत आहे. पाणीकर, घरकर भरण्यासाठी ज्या पद्धतीने ग्रामपंचायत कडून शक्तीचे नियम लावले जातात मग नाल्या उपसा करण्यासाठी सक्तीचे नियम का लावले जात नाही ?एखाद्या नागरिकांनी वेळेवर घरकर न भरल्यास त्याच्या घरातील साहित्य ग्राम पंचायत कडून जप्ती केले जाते . तर मग आता सांडपाण्यामुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे त्याचे काय? असे अनेक प्रश्न गावकरी विचारत आहेत.

विशेष म्हणजे पावसाळ्याच्या सुरुवातीला नागरिकांच्या घरात अंगणात पाणी शिरते. हीच स्थिती कित्येक वर्ष उद्भवली आहे. तरीसुद्धा प्रशासन जागे होत नाहीत. लोकांचे आरोग्य बिघडण्यापूर्वी ग्रामपंचायतीने त्वरित गाळ उपसा करून साफसफाई करावी. आणि फूटलेल्या नाल्यांची दुरुस्ती करावी अशी मागणी वार्ड क्र. २ मधील आणि गावातील संपूर्ण नागरिक करीत आहेत .

***' ग्रामपंचायतची जबाबदारी काय ? '***

गावात सर्वच वार्डात नाल्या बनल्या आहेत. परंतु एकही नाली व्यवस्थित नाही. सर्व नाल्या तुटलेल्या अवस्थेत आहेत. आता उन्हाळ्याचे दिवस असतानाही नाल्या तुंबून भरल्या आहेत. काही ठिकाणी नाल्या ओव्हरफ्लोव झाल्याने सांडपाणी रस्त्यावर येत आहे. तरीपण ग्रामपंचायत याकडे काहीही लक्ष देत नाही. नाली लगत घर असलेल्या नागरिकांच्या घरी कोणतेही कार्यक्रम असल्यास ते स्वतः नाली साफ करतात. जर नागरिक स्वतः नागरिक नाल्या साफ करत असतील तर मग ग्रामपंचायतची जबाबदारी काय ?

***'दुर्गंधी व डासामुळे नागरिक हैराण '***

धुसाळा ग्रामपंचायत प्रशासन गावातील नागरिकांकडून पाणीकर,गृहकर न चुकता दरवर्षी वसूल करत असते. पण गावातील स्वच्छतेवर काहीही लक्ष देत नाहीत. गावातील सांडपाण्याचा निचरा योग्य त्या पद्धतीने होत नसल्याने नाल्यात डासांची पैदास मोठ्या प्रमाणात होत आहे. संपूर्ण परिसरात दुर्गंधी पसरली आहे. त्यामुळे नागरिक चांगलेच हैराण झाले आहेत. या प्रकारामुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. त्यामुळे ग्रामपंचायत प्रशासनाने लवकरात लवकर दखल घ्यावी.

'काही ठिकाणी नाल्या ओव्हरफ्लोव होत आहेत. पाणी साचला आहे. लवकरात लवकर नाल्या साफ करून दुरुस्ती सुद्धा करण्यात येणार आहे. या आठवड्यात जास्त मजुरांच्या सहाय्याने संपूर्ण गावातील नाल्यातील केरकचरा साफ करून डासांची फवारणी सुद्धा करण्यात येणार आहे '

**धोंडू खंडाते**
**सरपंच**

# पौर्णिमेनिमित्त साकोली येथे बुद्ध संगीत महोत्सव

**महासागर प्रतिनिधी**

**साकोली , दि.१० मे :** नवव्या बुद्ध पौर्णिमेनिमित्त १२ मे रोजी होमगार्ड परेड ग्राउंड, साकोली येथे विशेष बौद्ध संगीतमय कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

गौतम बुद्धांनी दिलेल्या स्वातंत्र्य, समता, न्याय, त्याग आणि करुणा या मूल्यांचा प्रसार करणे हा या कार्यक्रमाचा उद्देश आहे. स्वाभिमानी सामाजिक संघटना आणि भीमसेना यांच्या संयुक्त विद्यमाने हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. यावेळी प्रबोधनकार संविधान मनोहरे हे त्यांच्या बौद्ध विचारांवर आधारित संगीतमय सादरीकरण करणार आहेत. कार्यक्रमाचे उद्घाटन आमदार नाना पटोले यांच्या हस्ते होणार आहे, तर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी खासदार डॉ.प्रशांत पडोळे असतील. सहउद्घाटक म्हणून इंजि. नरेश गणवीर उपस्थित राहणार आहेत.

संदेश ओम गायकवाड सादर करतील.कल्पना व्यासपीठावर इंजि. सचिन गजभिये, सुमित शहारे आपले विचार मांडतील. कार्यक्रमाच्या आयोजन समितीचे अध्यक्ष धम्म वासनिक आहेत. अध्यक्षा शीतल राऊत, होमराज कापगते, अश्विन नशीने, ग्यानीराम गोबाडे आदी विशेष अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी छत्रपती ग्रुप, सक्षम फाऊंडेशन, हजरत बाबा भाई साहेब उर्स कमिटी आदी सामाजिक संस्था



सहकार्य करत आहेत. शहरातील नागरिकांनी या कार्यक्रमात सहभागी होऊन बुद्ध विचार आत्मसात करून शहरात शांतता प्रस्थापित करावी, असे आवाहन संस्थेच्या वतीने करण्यात येत आहे.

# साकोली दिवाणी न्यायालयात आयोजित लोकअदालतीत ३६ प्रकरणाचा निपटारा

**महासागर प्रतिनिधी**

**सानगडी , दि.१० मे :** साकोली तालुका विधि सेवा समिती व तालुका अधिवक्ता संघाच्या वतीने साकोली दिवानी न्यायालयात शनिवार दि. १०मे ला आयोजित लोक अदालती मध्ये एकूण ३६ प्रकरणाचा निपटारा करण्यात आला.

यावेळी आपसी तडजोडीतून तब्बल १७ लाख ८४ हजार ७३६ रुपये वसूल करण्यात आले. साकोली येथील दिवाणी व फौजदारी न्यायालयाचे न्यायाधीश पॅनल प्रमुख श्री. व्हि. एम गायकवाड यांच्या अध्यक्षतेखाली ही लोक अदालत झाली .या दिवाणी व फौजदारी अशा एकूण ५२४ प्रकरणे दाखल करण्यात आली होती.

यात आपसी तडजोडीतून ३६ प्रकरणाचा निपटारा करण्यात आला.



प्रकरणी याप्रसंगी पॅनल सदस्य अधिवक्ता अशोक करवडे उपस्थित होते .

साकोली न्यायालयाच्या सभागृहात आलेल्या लोक अदालती मध्ये अधिवक्ता वर्ग ,न्यायालयीन कर्मचारी डी आर साठवणे, सहाय्यक अधीक्षक एन पी साकोरे, एन के धकाते, आर एन धांडे, पी.ए. शहारे ,आर एम नेवारे ,एस सी गमे, पि.के. निपाने,ए. जे. कापगते, एल. ए.मल्लानी, मनोहर लोथे, बबीता वासनिक, आर.बी .डोंगरे ,जी डब्लूयू लंजे ,सी के गायधने ,एस.एस. पेन्नीवार साकोली पोलीस स्टेशनचे पोलीस कर्मचारी, तसेच ट्राफिक पोलिस यांनी लोक अदालत यशस्वी करण्यासाठी सहकार्य केले.

# अहंकारावर नियंत्रण ठेवून आपण समाधानी जीवन जगूया!

**(जागतिक अहंकार जागरूकता दिन विशेष : ११ मे २०२५)**

-----------------

अहंकार ही एक मानसिक आरोग्य स्थिती आहे, जी व्यक्तीच्या आयुष्यातील प्रत्येक क्षणावर प्रभाव करते. ते काही प्रमाणात प्रेरणादायी आहे, परंतु त्याची सतत वाढ अनेक समस्यांना कारणीभूत ठरते, जे केवळ स्वतःचेच नाही तर त्याच्या सभोवतालच्या लोकांचेही जीवन विस्कळीत करते.

फक्त स्वार्थाबद्दल किंवा मी आणि माझा विचार केल्याने आपण मानसिक शांती समाधानापासून दूर जातो. इतिहास साक्षी आहे की या अहंकारामुळे राजे-महाराजे, सत्ता, राज्य, कीर्ती, संपत्ती गेली. बहुतेक युद्धांचे मुख्य कारण अहंकार राहिला होता, अहंकारामुळे दररोज असंख्य आयुष्ये उद्ध्वस्त होतात आणि या अहंकारामुळेच लोक रागाच्या भरात चुकीचे निर्णय घेतात आणि जीवनातील शांती आणि आनंद हिरावून घेतात.

आपले लहानशे जीवन मौल्यवान आहे, आपण ते मोकळेपणाने आणि शांततेने जगले पाहिजे. ते निराशा, भीतीत आणि रागात वाया घालवू नये, वेळ निघून गेल्यावर आयुष्यात पश्चातापाशिवाय काहीही उरत नाही.

संशोधनातून असे दिसून आले आहे की आपल्या बहुतेक दुःखांचे कारण अदृश्य अहंकारी मन असते, ज्यामध्ये श्रेष्ठता, कनिष्ठता, पूर्वग्रह, इतरांचे स्वतःच मूल्यमापन करणे, हाताळणी, राग, मत्सर, भीती, संताप, व्यसन, ताण, हिंसाचार, वंशवाद, लिंगभेद, प्रशंसा, मान्यता, प्रतिक्रियावादीपणा, सहानुभूतीचा अभाव, एकटेपणा, निराशा, प्रचार, धार्मिक आणि जातीचे युद्धे इत्यादी खोट्या भावनांचा समावेश आहे.

जागतिक अहंकार जागरूकता दिन दरवर्षी ११ मे रोजी जगभरात साजरा केला जातो. या मानसिक आजाराने ग्रस्त असलेल्या सर्वांना मदत करण्यासाठी आणि इतरांना या अदृश्य स्वरूपाच्या गैरवापराचे परिणाम अनुभवण्यापासून रोखण्यासाठी २०१८ मध्ये अहंकार जागरूकता चळवळ आणि जागतिक अहंकार जागरूकता दिनाची स्थापना करण्यात आली.

या दिवसाचे उद्दिष्ट अहंकाराशी संबंधित मुद्द्यांवर प्रकाश टाकणे, सर्वांना जागरूक राहण्यास, जागरूकता वाढविण्यास आणि स्वकेंद्रित किंवा अहंकारी वर्तनाविरुद्ध बोलण्यास प्रोत्साहित करणे आहे. अहंकारामुळे राग, पूर्वग्रह आणि हिंसाचार यासारख्या नकारात्मक वर्तनांना कसे जन्म मिळू शकतो हे समजून घेणे हे त्याचे ध्येय आहे.

हा दिवस राग, संताप आणि हिंसाचार यासारख्या अहंकाराने प्रेरित वर्तनाचे नकारात्मक परिणाम अधोरेखित करतो आणि व्यक्तींना अशा प्रवृत्तींना आव्हान देण्यासाठी आणि त्यांच्यावर मात करण्यासाठी प्रोत्साहित करतो. अहंकार ह्या मानसिक अवस्थेवर प्रत्येकाने मात केली पाहिजे.

अहंकार निरोगी आणि अस्वस्थ दोन्ही असू शकतो; निरोगी अहंकार एखाद्या व्यक्तीला स्वतःची ताकद आणि कमकुवतपणा समजून घेण्यास मदत करते, ज्यामुळे अधिक वास्तववादी ध्येये आणि अधिक सकारात्मक स्व-प्रतिमा निर्माण होते, जी प्रेरणा आणि लवचिकतेसाठी महत्त्वाची असू शकते.



**डॉ. प्रितम भी. गेडाम**
**८२३७४ १७०४१**
**prit00786@gmail.com**

आपल्या विचारांवर, भावनांवर आणि वर्तनांवर नियमितपणे चिंतन केल्याने आपल्याला ओळखण्यास मदत होते की आपला अहंकार आपल्या निर्णय घेण्यावर कधी प्रभाव पाडत आहे, तर इतरांचे दृष्टिकोन समजून घेणे आणि स्वीकारणे आपल्याला आपल्या अहंकारावर नियंत्रण ठेवण्यास आणि त्यांच्या प्रेरणांबद्दल गृहीत धरणे टाळण्यास मदत करू शकते.

स्वतःमध्ये सुधारणा करण्याचा प्रयत्न केल्याने आपल्याला अधिक सुरक्षित आणि निरोगी अहंकार निर्माण करण्यास मदत होऊ शकते. निरोगी अहंकार असलेले व्यक्ती कठीण परिस्थितींना चांगल्या प्रकारे तोंड देण्यास सक्षम असतात, ताणतणावाला रचनात्मक पद्धतीने तोंड देण्याची त्यांची क्षमता वाढवतात, सक्रिय सामना करण्याच्या धोरणांचा वापर करण्यास प्रोत्साहन देतात.

अस्वस्थ अहंकाराचा आपल्या मानसिक आरोग्यावर नकारात्मक परिणाम होतो. जे लोक स्वतःला इतरांपेक्षा श्रेष्ठ मानतात, इतरांबद्दल सहानुभूतीचा अभाव बाळगतात आणि इतरांच्या दृष्टिकोनाचा आदर करत नाहीत त्यांच्यात अस्वस्थ अहंकाराची लक्षणे असतात. अति अहंकारामुळे टीका स्वीकारण्यात अडचण येते आणि सहानुभूतीचा अभाव निर्माण होतो, ज्यामुळे नातेसंबंध ताणले जाऊ शकतात आणि मानसिक आरोग्यावर नकारात्मक परिणाम होऊ शकतो.

अहंकार एखाद्या व्यक्तीला टीकेबद्दल अतिसंवेदनशील बनवू शकतो, नकारात्मक अभिप्रायाने सहज चिडतो आणि स्वतःचा नाश करण्यास किंवा इतरांना हानी पोहोचवण्यास प्रवृत्त करतो. अस्वस्थ अहंकारामुळे टीका सहन करणे, संघर्षात सहभागी होणे आणि मर्यादा स्वीकारणे कठीण होऊन दीर्घकालीन ताण येऊ शकतो.

ज्या व्यक्तींमध्ये अक्रियाशील अहंकार असते ते त्यांच्या भावना नियंत्रित करण्यासाठी नकार, टाळाटाळ किंवा मादक पदार्थांचा गैरवापर यासारख्या अयोग्य पद्धतीने सामना करू शकतात. अहंकार निर्णय घेण्याची क्षमता बिघडवू शकते आणि आवेगपूर्ण किंवा अविचारी निर्णय घेण्यास कारणीभूत ठरू शकतो, ज्याचा आरोग्यावर नकारात्मक परिणाम होऊ शकतो.

जेव्हा अहंकार आपल्या नियंत्रणात असतो किंवा अहंकारामुळे आपण काळानुरूप लवचिक आणि बदलणारे बनतो, तेव्हा अहंकार आपल्याला काही नवीन ज्ञान देतो, जीवनात काहीतरी शिकवतो, आपण आपल्या चुकांमधून शिकतो आणि स्वतःमध्ये बदल घडवून आणतो आणि आपल्या कमकुवतपणा स्वीकारतो.

पण जेव्हा हा अहंकार आपल्या नियंत्रणाबाहेर जातो, तेव्हा हा मानवी अहंकार विनाशाकडे जाण्याचा मार्ग बनतो, कधीकधी अहंकार पाप आणि गुन्ह्याचे कारण देखील बनतो. आपण स्वतः यशस्वी होण्यापासून रोखत नाही, परंतु आपला अहंकार आपल्याला असे करण्यापासून रोखतो.

काही लोक त्यांच्या अहंकारामुळे खूप मौल्यवान नातेसंबंध गमावतात. अहंकार आपल्याला आपण चुकीचे आहोत हे जाणवू देत नाही, अहंकारी आणि मत्सरी लोकांना कधीही मनःशांती मिळत नाही. अहंकार आपल्या मनावर आणि मेंदूवर असतो, एकतर आपण आपल्या मेंदूवर राज्य करतो किंवा तो अहंकार आपल्या मेंदूवर राज्य करेल. अहंकारी व्यक्ती स्वतःच्या चुका पाहत नाही किंवा इतरांच्या चांगल्या गोष्टीही पाहत नाही.

आपला अहंकार निरोगी आणि त्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी, आपण त्याची मूळ कारणे समजून घेण्यावर लक्ष केंद्रित केले पाहिजे, नम्रता आचरणात आणली पाहिजे आणि सहानुभूती आणि आत्म-जागरूकता विकसित केली पाहिजे.

यामध्ये आपली ताकद आणि कमकुवतपणा मान्य करणे, स्वतःवरील टीका बुद्धिमत्तेने आणि सहजतेने स्वीकारणे आणि इतरांच्या कल्याणाला प्राधान्य देणे समाविष्ट आहे. स्वतः सोबतच इतरांसाठी चांगले विचार करणे महत्वाचे आहे.

आयुष्यात काम करताना आपले लक्ष साध्य करण्यासाठी ध्येय निश्चित करणे, ध्यानाचा सराव करणे, सकारात्मक स्व-संवाद वापरणे, आपले लक्ष वैयक्तिक लाभापासून अर्थपूर्ण अनुभवांकडे वळवणे, ह्या सारख्या प्रयत्नांतून आपण अहंकाराचा प्रभाव कमी करू शकतो आणि अधिक संतुलित आणि समाधानी जीवन जगू शकतो.

निरोगी अहंकार ही चांगली गोष्ट आहे कारण ती आपला आत्मविश्वास वाढवते, आपल्याला आपल्या भीतींना तोंड देण्यासाठी किंवा त्यावर मात करण्यासाठी प्रेरित करते. पण जेव्हा अहंकार आणि अभिमान नियंत्रणाबाहेर जातात तेव्हा ते आपल्याला नष्ट करतात.

***अहंकार आणि अभिमानावर नेहमी नियंत्रण ठेवा, त्यातून काहीतरी नवीन शिका. अहंकाराला खोटेपणा, ढोंग, देखावा, भांडण आणि स्पर्धेचे माध्यम बनवू नका. जेव्हा आपली नम्रता आपल्या अहंकारावर मात करेल तेव्हा आपण एक चांगले व्यक्ती बनू. जर आपण आपला अहंकार सोडला तर आपल्याला आनंदाचा आणि समाधानाचा अनुभव येऊ लागेल.***

***- महात्मा गांधी***

■ ■ ■

# शक्ती-१ आण्विक क्षेपणास्त्र : यशस्वी चाचणी!



(११ मे : भारतीय तंत्रज्ञान दिवस विशेष)

देशभरात ११ मे हा दिवस राष्ट्रीय तंत्रज्ञान दिन म्हणून साजरा केला जातो. तंत्रज्ञान हे मानवी संस्कृती घडवणाऱ्या घटकांत शासनव्यवस्था, समाजरचना, कर्म, तत्वज्ञान यांच्या इतकेच महत्व दिले आहे. तंत्रज्ञान हे मानवी सर्जनशील प्रज्ञेचे द्योतक आहे. तंत्रज्ञान विकसनामुळे मानवाचे जीवन अधिक सोयीस्कर बनत चालले आहे.

-----------------

आजच्या दिवशी ११ मे १९९८ रोजी भारताने एरोस्पेस अभियंता आणि दिवंगत माजी राष्ट्रपती डॉ.एपीजे.अब्दुल कलाम यांच्या मार्गदर्शनाखाली मोलाची कामगिरी केली. ती कामगिरी राजस्थान येथील भारतीय लष्कराच्या पोखरण चाचणी क्षेत्रातील होती. त्यात शक्ती-१ या आण्विक क्षेपणास्त्राची चाचणी यशस्वीपणे पार पाडली गेली.

**कृष्णकुमार गोविंदा निकोडे**
**गडचिरोली.**
**९४२३७१४८८३**

या प्रगतीचे प्रतीक ११ मे हा दिवस दरवर्षी राष्ट्रीय तंत्रज्ञान दिन म्हणून साजरा केला जातो. याशिवाय याच काळात देशातच विकसित झालेल्या पहिल्या स्वदेशी विमान हंस-१ने पहिले उड्डाण बेंगळुरू येथे घेतले. हे विमान वैज्ञानिक आणि औद्योगिक संशोधन परिषदेचे विमान नॅशनल एरोस्पेस लॅबोरेटरीजने विकसित केले होते. तसेच कमी पल्ल्याचे, जलद- प्रतिक्रिया देणारे, जमिनीवरून हवेत मारा करणारे- एसएएम क्षेपणास्त्र- त्रिशूल हा भारतातील गाइडेड क्षेपणास्त्र विकास कार्यक्रमाचा एक भाग होता.

देशाच्या या प्रचंड यशानंतर भारताचे तत्कालीन माजी पंत्रप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांनी ११ मे हा दिवस राष्ट्रीय तंत्रज्ञान दिवस म्हणून घोषित केला. भारतात सन १९९९पासून दरवर्षी तंत्रज्ञान विकास मंडळ यांच्या नेतृत्वात हा दिवस साजरा केला जातो.

११ मे १९९८ रोजी भारतात यशस्वी अणुचाचणी घेण्यात आली होती. त्यानंतरच अण्वस्त्रे असलेल्या देशांच्या यादीत भारताचे नाव समाविष्ट झाले. भारताने ऑपरेशन शक्ती अंतर्गत राजस्थानच्या पोखरण येथे यशस्वी अणुचाचणी केली. त्यानंतर १३ मे रोजी दोन विभक्त चाचण्या घेण्यात आल्या.

या चाचण्यांचे नेतृत्व माजी राष्ट्रपती डॉ.एपीजे. अब्दुल कलाम यांनी केले. त्यानंतर ११ मे १९९९ रोजी प्रथमच राष्ट्रीय तंत्रज्ञान दिन साजरा करण्यात आला आणि तेव्हापासून हा दिवस दरवर्षी साजरा केला जाऊ लागला. या दिवसाची घोषणा तत्कालीन पंतप्रधान अटल बिहारी वाजपेयी यांनी केली होती.

या दिवसापासून आजपर्यंत तंत्रज्ञान विकास मंडळाने तांत्रिक क्षेत्रात केलेल्या योगदानाबद्दल शास्त्रज्ञ व अभियंत्यांना सन्मान व प्रोत्साहन दिले आहे. वैज्ञानिक, डीआरडीओ- संरक्षण संशोधन आणि विकास संस्था, भाभा अणुसंशोधन केंद्र- बीएआरसी आणि एएमडीईआर- अणू खनिज संचालनालय अन्वेषण आणि संशोधन यांनी यशस्वीरीत्या चाचणी केली. हेच कारण होते ज्यामुळे भारत थर्मोन्यूक्लियर शस्त्रे तयार करण्यास सक्षम बनू शकला.

आज नॅशनल टेक्नोलॉजी डे- राष्ट्रीय तंत्रज्ञान दिन म्हणून भारतासाठी आजचा दिवस खास आहे. हा दिवस भारतासाठी अनेक कारणांमुळे विशेष आहे. वरीलप्रमाणे एक अतिशय रंजक इतिहास यामागे दडलेला आहे.

दरवर्षी ११ मे रोजी राष्ट्रीय तंत्रज्ञान दिन साजरा केला जातो. विज्ञान आणि तंत्रज्ञान क्षेत्रात भारताचे योगदान आणि या क्षेत्रात भारताने केलेल्या अतुलनीय कामगिरीची साक्ष देणारा हा दिवस म्हणावा लागेल. दरवर्षी याच दिवशी उत्साहात साजरा केला जातो. तसेच राष्ट्रीय तंत्रज्ञान दिनाच्या दिवशी हंस-१ या पहिल्या भारतीय विमानाने यशस्वी भरारी घेतली होती.

त्याशिवाय डीआरडीओने याच दिवशी त्रिशूल क्षेपणास्त्राची यशस्वी चाचणीही केली. हे एक क्षेपणास्त्र आहे जे त्याच्या लक्ष्यावर वेगाने हल्ला करते. हा इतिहास कायम स्मरणात रहावा आणि भारतीय युवापीढी या दिवसाची सदोदित प्रेरणा घेत रहावी. म्हणून हा दिवस मोठ्या उत्साहाने साजरा केला जातो, हे विशेष येथे उल्लेखनीय! भारतीय तंत्रज्ञान दिनानिमीत्त सर्वांना हार्दिक हार्दिक शुभेच्छा !!

■ ■ ■

# TDS चे आर्थिक वर्ष 2025-26 साठी नवीन रेजीम मध्ये तथा संपलेल्या आर्थिक वर्ष 2024-25 साठी TDS दर काय आहे?



**सोप्या भाषेत इन्कमटॅक्स आणि इन्वेस्टमेन्ट**

**सीए. गोविंदप्रसाद एस. मुंदडा**
**सीए. आकाश जी. मुंदडा**
**जालना**

गेल्या अनेक आठवड्यापासुन आपण TDS तथा TCS बद्दल सोप्या भाषेतील प्रश्नोत्तर रूपाने अभ्यास करत आहोत. आज आपण याच बद्दलचा नवीन विषय बघणार आहोत, जे व्यवहारात प्रत्येक करदात्यास माहिती असणे आवश्यक आहे.

प्रश्न - करनिर्धारण वर्ष 2026-27 या साठी नवीन रेजीम मध्ये TDS चे दर काय आहे ?

■ करनिर्धारण वर्ष 2026-27 म्हणजेच आपले आर्थिक वर्ष 2025-26 असे समजायचे. नवीन रेजीम मध्ये व्यक्ती, HUF किंवा AOP या बद्दल चे TDS रेट खालील प्रमाणे आहेत. या AOP मध्ये कोऑपरेटीव सोसायटीला हे दर लागु नाहीत, हे लक्षात ठेवावे. तसेच AOP मध्ये अशा कलम 115 BAC (1 अ) मध्ये Option म्हणजे पर्याय वापरला आहे.

| नं | आर्थिक वर्ष 2025-26 | करनिर्धारण वर्ष 2026-27 |
|---|---|---|
| 1 | 4,00,000 पर्यंत | NIL |
| 2 | 4,00,001 ते 8,00,000 | 5% |
| 3 | 8,00,001 ते 12,00,000 | 10% |
| 4 | 12,00,001 ते 16,00,000 | 15% |
| 5 | 16,00,001 ते 20,00,000 | 20% |
| 6 | 20,00,001 ते 24,00,000 | 25% |
| 7 | 24,00,001 च्या वर | 30% |

**नोट :- वरील आलेल्या आकड्यावर 4% सेस द्यावा लागेल.**

**प्रश्न -** आर्थिक वर्ष 2024-25 साठी चे TDS दर काय आहे ?

■ करनिर्धारण वर्ष 2025-26 साठी खालील TDS दर आहे.

नोट - लिमिट म्हणजे ती रक्कम ज्याच्या पेक्षा कमी रक्कम मिळाली असता TDS कपात करण्याची आवश्यकता नाही.

| कलम | हेड | लिमिट | दर (%) |
|---|---|---|---|
| 194A | बँक किंवा पोस्ट ऑफिस कडून मिळणारे व्याज | 40,000<br>50,000<br>(वरिष्ठ नागरिक) | 10% |
| 194A | वरील सोडुन व्याज किंवा लाभांश | 5,000 (वरिष्ठ नागरिक 50,000) | 10% |

| कलम | हेड | लिमिट | TDS दर |
|---|---|---|---|
| 194B | लॉटरी | 10,000 | 30% |
| 194BB | घोड्याच्या रेस मध्ये मिळालेले पैसे | 10,000 | 30% |
| 194C | कॉन्ट्रॅक्टर किंवा सब कॉन्ट्रॅक्टर यांना दिलेले पेमेंट | 30,000/- Single Payment किंवा 1,00,000/- एका वर्षात | 1% व्यक्ती, HUF, APO/BOI तथा 2% Others |
| 194-D | Insurance कमिशन | 15,000 | 10% |
| 194H | ब्रोकरेज कमिशन | 15,000 | 2% |

| कलम | हेड | लिमिट | रेट |
|---|---|---|---|
| 194-I | व्यक्ती किंवा HUF द्वारे भाड्याचे पेमेंट | दर महिन्याला 5000 पेक्षा जास्त | 2% |
| 194-I | Plant & मशीनरी चे भाडे | 2,40,000 | 2% |
| 194-I | Plant & मशीनरी व्यतिरिक्त चे भाडे | 2,40,000 | 10% |
| 194-J | प्रोफेशनल फीस | 30,000 | 10% |

वरील दर हे TDS (टी.डी.एस) ची रक्कम कपात करण्याचे दर आहेत.

प्रश्न - Scrap, दारू वैगरे ना TCS लागु आहे. TCS चे दर खालील प्रमाणे आहेत.

| कलम | हेड | लिमिट | दर |
|---|---|---|---|
| 204-CE | TCS- Scrap | No Limit | 1% |
| 206-CA | दारु पिण्यासाठी (TCS) (Liquor for Human consumption) | No Limit | 1% |
| 206-C | माइनरल – कोयला/ आयरन ओर किंवा लिग्नाइट (दगडी काळा कोळसा) | No Limit | 1% |

| कलम | हेड | लिमिट | रेट |
|---|---|---|---|
| 206-C | तेंदूची पाने | No Limit | 5% |
| 206-C | लाकूड (टिम्बर) | No Limit | 2.5% |
| 206-C | मोटर कार | 10 लाखापेक्षा जास्त | 1% |

**प्रश्न -** टी.डी.एस. साठी पॅन नंबर आवश्यक आहे का ? पॅन नंबर नसल्यास त्याचे काय परिणाम होतील ?

■ आपण आधीच्या लेखात बघितले की deductor यांना deductee कडून टॅक्स कापून नंतर सरकारी खात्यात जमा करावे लागते. यासाठी deductor यांनf deductee चे PAN नंबर आवश्यक असते जर deductee यांनी PAN नंबर दिले तर वर टेबल मध्ये कायद्याने दिलेल्या रेट प्रमाणे TDS कापावे लागेल परंतु जर deductee यांनी PAN नंबर नाही दिले तर deductor यांना 20% किंवा दिलेले जे दर असतील, त्या पैकी जे दर जास्त राहील त्या दराने TDS कापुन सरकारी खजिन्यात भरणे आवश्यक आहे.

**प्रश्न -** बेसीक लिमिट च्या खाली पेमेंट किंवा व्यवहार झाला असेल तर TDS कापणे कायद्याने आवश्यक आहे का ?

नाही. जर Threshold लिमिटच्या खाली पेमेंट असेल तर TDS कापण्याची आवश्यकता नाही. तसेच व्यक्ती किंवा HUF चा करदात्यांना बेसिक Exemption लिमिट च्या आत करपात्र उत्पन्न असेल तर त्यांना फॉर्म 15 G किंवा फॉर्म 15 H, हे फॉर्म भरून देणे आवश्यक आहे, ज्या मुळे बँक किंवा Deductor हे TDS करणार नाही.

TDS ची अधिक माहिती आपण पुढील आठवड्यात बघणार आहोत. आपल्या काही सुचना असल्यास आपण व्हॉट्सप करून 9422218428 या नंबर वर मेसेज करू शकता.

■ ■ ■

# शिक्षकी पेशा!

**(कालच्या अंकावरून पुढे)**

पूर्वी शिक्षक होण्याचे ध्येय ठेवलेले हुशार विद्यार्थी स्वतःला त्या त्या विषयातील ज्ञान व ह्य कौशल्ये प्राप्त करून तज्ञ बनत, मगच शिक्षण क्षेत्रात रुजू होत. अश्या शिक्षकांन फार मान असे! नुसत्या त्या शिक्षकाच्या नावावर त्या शिक्षण संस्थेला ओळखत असत. आजकाल शिक्षण संस्था ही राजकरण्याच्या नावाने ओळखल्या जातात.

शिक्षण संस्थांचा बाजार झाल्याने, अश्या प्रकारच्या संस्था योग्य, तज्ञ अशा मान्यवर शिक्षकांना आपल्या संस्थेत रुजू करून घेत नाहीत. कारण त्यांना जास्त वेतन द्यावे लागू नये. फक्त नगास-नग अशी शिक्षक भरती केली जाते. मग तो रुजू करून घेतलेला व्यक्ति संस्था चालकाच्या संबंधितांपैकी, कमी वेतनावर काम करण्यास तयार, जी हुजुरी करणारा, व दाखवता येणारे प्रमाणपत्र असलेला हवा. त्याच्या ज्ञानाचा काहीही संबंध नाही.

**उत्तरार्ध**

**डॉ. अविनाश प. परांजपे**
**ए 2/ जी 7,**
**रचना आनंदवन सोसायटी**
**वानाडोंगरी, नागपूर.**

हीच पद्धती खुद्द सरकारही अवलंबत असल्याने त्यांनी शिक्षक पदावर नेमणुका न करता शिक्षण सेवक नावाने ॲडजेस्टमेंट करून नगास-नग प्रकार सुरु केला आहे. बरे, हा सर्व खेळ काही फक्त शाळांच्याच बाबतीत होत नाही तर पार उच्च शिक्षणात देखील सुरु आहे. कला, वाणिज्य, विधी महाविद्यालये तर सोडाच, आज राज्यातील कोणत्याही शासकीय अभियांत्रिकी तथा वैद्यकीय महाविद्यालयात तज्ञ प्राध्यापकांची संख्या अत्यंत कमी दिसते. कारण शासनाने नेमणुका केल्याच नाहीत. त्या मुळे खाजगी शिक्षण संस्था तसेच करतांना दिसतात.

आपल्या महाविद्यालयात अडमिशन्स झाल्याच पाहिजेत; अन्यथा हा जोड धंदा बंद होईल, म्हणून विद्यार्थ्यांना शक्यतोवर नापासच करु नये असा अलिखित नियमच बनला आहे.

आता या सर्व बाबींचा समाजावर कसा परीणाम होतोय पहा. व्यवसायिकांना कारकून, अकाऊंटंट म्हणुन नेमणुक करायची असो किंवा इंजीनियर हवा असो. नुसते पदवीचे सर्टिफिकेट घेऊन आलेल्या बहुतांश उमेदवारांना त्यांच्या विषयाचे जुजबी व किमान ज्ञान पण आलेले आढळत नाही. त्याचा परीणाम बेरोजगारी मध्ये वाढ होणे, आणि उद्योगांना व व्यवसायिकांना, योग्य मनुष्यबळ उपलब्ध होत नाही, हा आहे.

माझाच अनुभव, नवीनच शिकाऊ अकाऊंटंटला बँकेत जाऊन धनादेश (चेक) जमा करून ये म्हणुन सांगितले, तो जाऊन पे इन स्लिप घेऊन आला. ती भरायची कशी म्हणुन आमच्या फायनान्स मॅनेजरला विचारु लागला . मॅनेजरने त्याला तुला रिकाम्या जागा भरता येत नाहीत का? म्हटल्यावर लहान तोंड करून बसला.

मग याचे खापर फुटते ते शिक्षकाच्या माथ्यावर! तुला एवढेही येत नाही? तुला कोणी शिकवले रे ? तुम्हे किसने सिखया रे? “ Who Taught You?” असे टोमणे कानावर येतात. म्हणुनच समस्त शिक्षकी पेशा स्विकारलेल्या मान्यवर व्यक्तींना हात जोडून विनंती, की यावर नक्की विचार करावा.

■ ■ ■

# एक हिरवी मिर्ची तुमचं आयुष्य वाढवेल



निरोगी आरोग्यासाठी आहारामध्ये योग्य प्रमाणात पोषक आहाराचा समावेश करणे गरजेचे आहे. भारतीय स्वयंपाकघरात अनेक मसाले सांगितले आहेच ज्यांचे सेवन केल्यामुळे पोषक तत्वं मिळतात. निरोगी आरोग्यासाठी शरीरातील रोगप्रतिकारकशक्ती वाढवणे गरजेचे असते. हिरव्या मिरच्यांचा वापर केवळ तिखटपणा वाढवण्यासाठीच नाही तर आरोग्यासाठी देखील केला जातो. हिरव्या मिरच्यांमध्ये व्हिटॅमिन सी, व्हिटॅमिन ए, पोटॅशियम आणि लोह यासारखे आवश्यक पोषक घटक असतात, जे शरीराची रोगप्रतिकारक शक्ती मजबूत करण्यास मदत करतात.

पदार्थाची चव वाढवण्यासाठी अनेक मसाल्यांचा वापर केला जातो. त्यापैकी एक म्हणजे हिरवी मिर्ची. हिरव्या मिरच्यांमध्ये असलेले कॅप्सेसिन नावाचे घटक चयापचय वाढवते, ज्यामुळे वजन जलद कमी होण्यास मदत होते . हे घटक पचन सुधारते आणि भूक नियंत्रित करते, जे जास्त खाणे टाळण्यास मदत करते. तसेच, हिरव्या मिरच्यांमध्ये कॅलरीजचे प्रमाण नगण्य असते, ज्यामुळे वजन नियंत्रित करण्याचा प्रयत्न करणाऱ्यांसाठी ते योग्य ठरते.

हिरव्या मिर्चीच्या सेवनामुळे पदार्थाची चव वाढत नाही तर आरोग्याला देखील अनेक फायदे होतात. हिरव्या मिर्चीच्या नियमित वापरामुळे आरोग्य निरोगी राहण्यास मदत होते. हिरव्या मिरच्यांचे सेवन केल्याने दृष्टी सुधारते, त्वचेचे आरोग्य सुधारते आणि मूड सुधारतो .

त्याचे अँटिऑक्सिडंट गुणधर्म शरीराचे हानिकारक मुक्त रॅडिकल्सपासून संरक्षण करतात, ज्यामुळे वृद्धत्वाची प्रक्रिया मंदावते. तथापि, तिखटपणामुळे होणारे कोणतेही दुष्परिणाम टाळण्यासाठी ते संतुलित प्रमाणात सेवन केले पाहिजे.

हिरव्या मिरच्यांमध्ये असलेले कॅप्सेसिन रक्तदाब नियंत्रित करण्यास आणि कोलेस्टेरॉलची पातळी कमी करण्यास मदत करते. हे रक्तवाहिन्या निरोगी ठेवते आणि हृदयरोगाचा धोका कमी करते. याशिवाय, हिरव्या मिरच्यांमध्ये अँटीऑक्सिडंट्स असतात, जे मुक्त रॅडिकल्समुळे होणाऱ्या नुकसानापासून हृदयाचे रक्षण करतात.

हिरव्या मिरच्यांमध्ये व्हिटॅमिन सीचे प्रमाण जास्त असते, जे शरीराची रोगप्रतिकारक शक्ती मजबूत करते. हे सर्दी, खोकला आणि इतर संसर्गांशी लढण्यास मदत करते.

याशिवाय, हिरव्या मिरच्यांमध्ये अँटीबॅक्टेरियल गुणधर्म देखील असतात, जे शरीराचे बॅक्टेरिया आणि विषाणूंपासून संरक्षण करतात.

हिरव्या मिरच्यांमध्ये व्हिटॅमिन ए आणि सी भरपूर प्रमाणात असते, ज्यामुळे त्वचा निरोगी आणि चमकदार बनते. हे त्वचेच्या पेशी दुरुस्त करण्यास मदत करते आणि वृद्धत्वाची लक्षणे कमी करते. याशिवाय, व्हिटॅमिन ए दृष्टी सुधारते आणि मोतीबिंदूसारख्या समस्या टाळते. हिरव्या मिरच्यांमध्ये आढळणारे घटक पाचक एंजाइम्सचे स्राव वाढवतात, ज्यामुळे अन्नाचे पचन सुधारते. हे गॅस, अपचन आणि बद्धकोष्ठता यासारख्या समस्यांपासून आराम देण्यास मदत करते. हिरव्या मिरच्यांमध्ये असलेले फायबर आतडे स्वच्छ करण्यास मदत करते, ज्यामुळे पचनसंस्था निरोगी राहते.

■ ■ ■

**अशोकायन**

**प्रा. अशोक सारडा**
**मेहकर**
**(९४२१३९४३३९)**



## खिरापत

**आळीपाळीने**
**मंत्रीपद घेऊ**
**वाटून सारे**
**खिरापत खाऊ ...**

**जगा व जगु द्या**
**आमचे आहे तत्व**
**टिकून राहिले पाहिजे**
**भौ पक्षाचे अस्तित्व ..!**

**स्वाथार्साठीच आम्ही**
**हात मिळवणी करतो**
**राजकीय फायदे**
**पदरात पाडून घेतो!**

# अदानी समूहाने खनिज वाहतुकीसाठी भारतातील पहिला हायड्रोजनवर चालणारा ट्रक केला तैनात



**रायपूर, १० मे :** अदानी समूहाची प्रमुख कंपनी असलेल्या अदानी एंटरप्रायझेसने भारतातील पहिला हायड्रोजन फ्युएल सेल ट्रक सुरू केला आहे, ज्याचा उद्देश अधिक स्वच्छ वाहतुकीला प्रोत्साहन देणे आहे. हे हायड्रोजनवर चालणारे ट्रक्स कंपनीच्या लॉजिस्टिक्समधील पारंपरिक डिझेल ट्रकची हळूहळू जागा घेतील.

भारतीय व आंतरराष्ट्रीय ऊर्जा तंत्रज्ञान कंपन्या आणि एका मोठ्या ऑटोमोबाईल उत्पादकासोबत भागीदारीत, अदानी हायड्रोजन फ्युएल सेल बॅटरीवर चालणारे मालवाहू ट्रक्स विकसित करत आहे. स्मार्ट तंत्रज्ञान आणि तीन हायड्रोजन टँकने सुसज्ज असलेला प्रत्येक ट्रक २०० किलोमीटरच्या पल्ल्यापर्यंत ४० टनांपर्यंतचा माल वाहून नेऊ शकतो.

१० मे रोजी छत्तीसगडचे मुख्यमंत्री श्री. विष्णुदेव साय यांनी रायपूरमध्ये या पहिल्या ट्रकला हिरवा झेंडा दाखवला. हा ट्रक गारे पेल्मा ब्लॉकमधून राज्याच्या वीज प्रकल्पाकडे कोळसा वाहून नेण्यासाठी वापरला जाणार आहे.

छत्तीसगडमध्ये भारतातील पहिल्या हायड्रोजनवर चालणाऱ्या ट्रकचा शुभारंभ हा राज्याच्या शाश्वततेच्या बांधिलकीचा पुरावा आहे. अशा उपक्रमांमुळे आपला कार्बन फूटप्रिंट लक्षणीयरीत्या कमी होईल आणि उद्योगांसाठी एक नवीन आदर्श उभा राहील. देशाच्या वीज गरजा पूर्ण करण्यात छत्तीसगड अग्रेसर आहेच, त्याचबरोबर शाश्वत उपाय स्वीकारण्यातही नेतृत्व करत आहे, असे मुख्यमंत्री विष्णुदेव साय यांनी सांगितले.

छत्तीसगड स्टेट पॉवर जनरेशन कंपनी लिमिटेडने स्पर्धात्मक निविदेद्वारे अदानी एंटरप्रायझेसला गारे पेल्मा ब्लॉकसाठी खाण विकासक व ऑपरेटर म्हणून नियुक्त केले आहे.

हायड्रोजनवर चालणाऱ्या ट्रक्सचा उपक्रम हा अदानी समूहाच्या डीकार्बनायझेशन व जबाबदारीने खाणकाम करण्याच्या वचनबद्धतेतील महत्त्वाचा टप्पा आहे. आम्ही स्वयंचलित डोझर पुश तंत्रज्ञान, सौर ऊर्जा, डिजिटल उपक्रम आणि झाडे स्थलांतरित करणाऱ्या ट्रान्सप्लांटरसह पर्यावरणावर किमान परिणाम होणाऱ्या आदर्श खाणी विकसित करत आहोत. शाश्वत खाण पद्धतींमध्ये नवीन मानके प्रस्थापित करताना सर्वांना परवडणारा आणि विश्वासार्ह वीज पुरवठा सुनिश्चित करण्याचे आमचे ध्येय आहे, असे अदानी एंटरप्रायझेसचे डायरेक्टर व नॅचरल रिसोर्सेस विभागाचे सीईओ डॉ. विनय प्रकाश यांनी सांगितले.

खनन क्षेत्रात प्रामुख्याने डिझेलवर चालणाऱ्या यंत्रसामग्रीचा वापर होत असतो परंतु, स्वच्छ इंधनांकडे वळल्यास कार्बन उत्सर्जन व ध्वनि प्रदूषण कमी होईल. यामुळे भारताची कच्च्या तेलावरील आयातही कमी होईल आणि कार्बन फूटप्रिंटही घटेल. विशेषतः, अदानी नॅचरल रिसोर्सेस ही आशियातील पहिली कंपनी आहे जिने डोझर पुश सेमी-ऑटोनॉमस टेक्नोलॉजी वापरण्यास सुरुवात केली आहे, ज्यामुळे सुरक्षा व शाश्वततेत भर पडली आहे.

## फॅनटरटेनमेंटची सुरूवात! २३ व्या मारूती सुझुकी प्रस्तुत झी सिने अ‍ॅवॉर्ड्स २०२५ मध्ये आपल्या फेव्हरेट स्टार्सना जिंकवण्यासाठी आताच वोट करा!




**मुंबई, १० मे :** दोन दशकांहून अधिक काळापासून झी सिने अ‍ॅवॉर्ड्स हे सिनेमॅटिक सर्वोत्कृष्टतेची निशाणी राहिले असून भारतीय सिनेसृष्टीतील सर्वोत्तम कलेचे साजरीकरण ते करत असून वैश्विक मंचावर सिनेमाची जादूही दर्शवत आहेत. आयकॉनिक परफॉर्मन्सेस आणि अविस्मरणीय क्षणांसह हे अ‍ॅवॉर्ड्स बॉलीवूडच्या समृद्ध वारशाचा महत्त्वाचा पल्ला बनला आहेत. कलात्मक प्रतिभा आणि प्रेक्षकांची पसंती अशा दोन्ही गोष्टींचा सन्मान करत हे अ‍ॅवॉर्ड्स विश्वासार्हतेला लोकप्रियतेशी जोडतात.

ह्यावर्षी मारूती सुझुकी प्रस्तुत २३ वे झी सिने अ‍ॅवॉर्ड्स २०२५ हे फॅनटरटेनमेंट ह्या आपल्या खास संकल्पनेच्या माध्यमातून बॉलीवूडच्या अतुलनीय उत्कटतेला विशेष आदरांजली प्रदान करत पुढच्या स्तरावर जात आहेत. प्रथमच प्रकाशाचा झोत सिताऱ्यांवरून हटत त्यांच्या सर्वांत मोठ्या समर्थकांकडे वळत आहे कारण सिनेमा आणि त्याच्या चाहत्यांमधील सखोल आणि दृढ नात्याचा सन्मान करण्यासाठी बॉलीवूड एकत्र येत आहे. १७ मे रोजी एनएससीआय डोम, वरळी, मुंबई येथे हा सोहळा पार पडण्यात येणार असून ह्यावर्षीचा हा भव्य सोहळा अतुलनीय मनोरंजन, जबरदस्त परफॉर्मन्सेस आणि अविस्मरणीय क्षण प्रदान करण्याचे वचन देतो.

फॅनटरटेनमेंटला पुढच्या स्तरावर नेत झी सिने अ‍ॅवॉर्ड्स २०२५ हे चाहत्यांचे मत जाणून घेण्यासाठी अनेक मार्ग प्रदान करत आहे. संकेतस्थळ, सोशल मीडिया, झी५ अ‍ॅप यांसह अनेक टचपॉईंट्सवर वोटिंग आता सुरू आहे आणि ह्यावर्षी हे आणखी भव्य बनत आहे कारण चाहते व्हॉट्स अ‍ॅपच्या माध्यमातून किंवा ११ शहरांतील ३० ठिकाणांवरील झी सिने अ‍ॅवॉर्ड्स किऑस्क्सवरही वोट देऊ शकतात. तुम्ही ऑनलाईन असाल किंवा ऑन दि गो, तुमचे वोट अतिशय महत्त्वाचे आहे क्यूंकि फॅन्स है तो सिनेमा है!

दीर्घप्रतीक्षित व्ह्युअर्स चॉईस कॅटेगरीजसाठी आता अधिकृतपणे वोटिंग लाईव्ह असून नॉमिनीज जाणून घ्या आणि तुमच्या आवडत्या सिताऱ्यांना वोट द्यायला सुरूवात करा. तुमच्या फेव्हरेट्सना ट्रॉफी जिंकताना पाहण्यासाठी पुढील कोणत्याही माध्यमातून तुमचे वोट द्या.

## सोनल पनवार: काही कळण्याआधीच माझ्यामध्ये अभिनयाप्रती आवड निर्माण झाली



**मुंबई, १० मे :** कधी-कधी, नियती सर्वोत्तम गाथा रचते आणि एण्ड टीव्हीवरील तरूण व प्रतिभावान अभिनेत्री सोनल पनवारसाठी हे अगदी खरे ठरले आहे. आज, ती मालिका हप्पू की उलटन पलटन'मधील कणखर, शिस्तबद्ध आणि उच्च स्तरावरील पोलिस अधिकारी इन्स्पेक्टर मलायकाच्या भूमिकेत प्रेक्षकांचे मन जिंकत आहे. ती तिच्या मूल्यांसाठी ओळखली जाते आणि विलक्षण सिंग कुटुंबामध्ये तिचा दबका दरारा आहे. आपल्या अभिनय प्रवासाला उजाळा देत सोनल पनवार ऊर्फ मलायका म्हणाल्या, माझ्यामध्ये नकळतपणे अभिनयाची आवड निर्माण झाली. काही वर्षांपूर्वी क्राइम शोसाठी एका एपिसोडचे दिग्दर्शन करत असलेल्या मित्राने भूमिकेकरिता शेवटच्या क्षणी मला कॉल केला. त्यावेळी माझी अभिनेत्री बनण्याची इच्छा नव्हती. मी फक्त त्याला मदत करत होते. पण, सेटवर प्रवेश करताच तेथील वातावरणाने माझे लक्ष वेधून घेतले. कॅमेरा, लाइट्स, काम करणारी टीम पाहून मी भारावून गेले. लोक मेकअप करत होते, प्यायला पाणी देत होते आणि सर्वकाही छान वाटत होते. मी स्वत:शी विचार केला, वाह, अभिनेत्री असल्यास अशी चांगली वागणूक मिळते?' त्या क्षणाने माझ्या जीवनाला कलाटणी दिली.'' पण पुढील मार्ग ग्लॅमरस नव्हता. त्या पुढे म्हणाल्या, अर्थातच, पुढील प्रवास पहिल्या दिवसाइतका सोपा नव्हता. मला उत्तम भूमिका मिळवण्यासाठी अनेक ऑडिशन्स द्यावे लागले. शेवटी, मला माझी आवडती अभिनेत्री रिचा चढ्ढासोबत वेब सिरीजमध्ये भूमिका मिळाली. प्रामाणिकपणे सांगायचे तर मी त्यावेळी सेटवर सह-कलाकारापेक्षा चाहती होती. पण त्या सुरूवातीच्या अनुभवांनी मला अनेक धडे दिले, तसेच मोठ्या भूमिका मिळवण्यासाठी आवश्यक असलेला आत्मविश्वास दिला.''

मालिका हप्पू की उलटन पलटन'मध्ये सामील होण्याच्या आणि मलायकाची भूमिका साकारण्याच्या अनुभवाबाबत सांगताना सोनल म्हणाल्या, या मालिकेमधील माझा प्रवास अत्यंत आनंददायी होता. माझी खरंच या मालिकेमध्ये सामील होण्याची इच्छा होती. मी बहुतांश कलाकार व टीमला ओळखत होते, कारण मी त्याच प्रोडक्शन हाऊसच्या दुसऱ्या मालिकेमध्ये त्यांच्यासोबत काम केले होते. मी मालिकेमध्ये नंतर सामील झाले आणि भूमिकेसाठी दुसऱ्या अभिनेत्रीची जागा घेतली. पण माझे दिग्दर्शक व सह-कलाकारांचा पाठिंबा व मार्गदर्शनामुळे सर्वकाही सुरळीत घडले.'' सोनलसाठी इन्स्पेक्टर मलायका भूमिकेपेक्षा अधिक आहे. त्या म्हणाल्या, मला या मालिकेचा भाग असण्याचा आणि इन्स्पेक्टर मलायकाची भूमिका साकारण्याचा आनंद होत आहे. माझ्यासाठी मी फक्त भूमिका नाही, तिच्यामध्ये धैर्य, दृढनिश्चय आणि नारीशक्ती सामावलेली आहे. मलायकाची भूमिका साकारण्यासह मी सक्षम होत आहे. ती धाडसी, मोहक असण्यासोबत मनापासून मत व्यक्त करते आणि तिला घरातील विलक्षणपणावर कशाप्रकारे मात करावी हे माहित आहे.''

# ११ मे रोजी ज्योतिराव फुले महात्मा पदवीने सन्मानित झाले होते

प्रत्येक दिवस हा काही ना काही नवीन घेऊन येत असतो व आपली छाप पाडून इतिहासामध्ये अजरामर होत असतो. म्हणून तर प्रत्येक दिवसाची दिन विशेष म्हणून एक नाविन्यपूर्ण नोंद केलेली असते. आपण सहज दिन विशेष कडे नजर टाकली तर काही ना काही नावीन्य व वेगळेपण दिसत असते. केवळ ह्या दिवसाच्या नावीन्यपुर्णाने आपण तो दिवस साजरा करत असतो. हा दिवस साजरा केल्यामुळे आपल्याला प्रेरणा, ऊर्जा, उत्साह व काही तरी नवीन शिकायला मिळून आपल्याला ज्ञान प्राप्त होऊन आपली ज्ञानात अधिक भर पडत असते.

असाच एक ऐतिहासिक दिवस आहे तो म्हणजे ११ मे १८८८ ह्या दिवशी शिक्षण महर्षी ज्योतिराव फुलेंना मुंबईतील मांडावी कोळीवाडा येथे महात्मा पदवी देऊन त्यांच्या चाळीस वर्षाच्या सामाजिक कार्याचा गौरव करण्यात आला होता. महात्मा ही पदवी बडोद्याचे महाराज सयाजीराव गायकवाड यांनी ज्योतिराव फुले यांना दिली. बडोद्याचे राजे महाराज सयाजीराव गायकवाड खुद्द कार्यक्रमाला उपस्थित राहून ज्योतिराव फुल्याना सन्मानित करणार होते परंतु त्यांची प्रकृती ठीक नसल्यामुळे ते उपस्थित राहू शकले नव्हते. पण महात्मा पदवी देण्याची मूळ संकल्पना बडोद्याचे राजे महाराज सयाजीराव गायकवाड यांचीच होती. ज्योतिराव फुले सभास्थानी येताच, उपस्थितांच्या डोळ्यात कृतज्ञता होती तर काहींच्या डोळ्यातून अश्रू वाहू लागले होते. या महान कृतज्ञता सोहळ्यास सत्यशोधक चळवळीचे नेते नारायण मेघाजी लोखंडे, रावबहादूर वांदेकर यांनी पुढाकार घेतला होता. यावेळी गौरवपूर्ण भाषण नारायण मेघाजी लोखंडे यांनी केले होते. ते याप्रसंगी म्हणाले होते की ज्योतिबा म्हणजे मानवी हक्काचे दरवाजे उघडणारे हे प्रथम महापुरुष आहेत.

महात्मा म्हणजे महान आत्मा ज्यांचा आत्मा महान असतो. जे महान काम करतात त्यांनाच महात्मा ही पदवी मिळते. आपण आज सहज ज्योतिराव फुले यांच्या कार्यावर नजर टाकली तर ते खरंच महान, महात्मा होते हे आढळून येते.

मानवी स्वभाव आहे, मानव आहे म्हणजे त्याला स्वार्थ हा लागलाच आहे. संसार सुद्धा आला. महात्मा ज्योतिराव फुले हे घरचे चांगले होते. त्यांनी त्यांचा व्यापार केला असता तर ते खूप सुखी जीवन जगू शकले असते. परंतु ते खरंच महात्मा होते. म्हणजे काय तर ते महान विचार करत होते. ते स्वयं केंद्रित नव्हते. त्यांना समाजातील गरिबी, अन्याय, अनिष्ट प्रथा बघवत नसत. ते संपूर्ण मानवजाती एक सामान आहेत असे समजत असत. त्यांच्या मध्ये भेदभाव उच्च निच्च बघत नसत कारण की ते खऱ्या अर्थाने महात्मा होते.

महात्मा ज्योतिबा फुल्यानी छत्रपती शिवाजी महाराजांची रायगडावरील समाधी शोधून काढली. एव्हढेच नाही तर छत्रपती शिवाजी महाराजांवर पोवाडा सुद्धा लिहिला. हा पोवाडा गाऊन छत्रपती शिवाजी महाराजांचे कार्य सर्वांपर्यंत पोहचविले. एव्हढेच नाही तर छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती सुद्धा साजरी करायला त्यांनी सुरुवात केली. ही जयंती मोठ्या थाटात २१ दिवस साजरी होत असे. छत्रपती शिवाजी महाराजांची माहिती पोवाडा व जयंती साजरी करून प्रत्येकामध्ये शिवाजी जागविण्याचे महान काम महात्मा फुल्यानी केले.

रूढी परंपरा ज्या चांगल्या नाहीत त्याचा कडाडून विरोध केला व जनसामान्यात मोहीम उभारून क्रांती केली. ह्यासाठी त्यांना आपल्या आयुष्यात खूप मोठी किंमत चुकवावी लागली. अपमान सहन करावा लागला. घरातून व गावातून त्यांना बहिष्कृत केल्या गेले. तरी पण ते आपल्या उद्दिष्टांपासून दूर हटले नाही. बऱ्याच वेळा त्याच्यावर संकटकांनी प्राणघातक हल्ला सुद्धा केला होता. परंतु समाजाने एव्हढा जाच करून सुद्धा त्यांची बदल्याची भावना कधीच नव्हती. उलट जे हल्लेखोर त्यांच्यावर हल्ला करायचे त्याचे उत्तर ते तर्कनिष्ठ पणे देऊन त्यांना वैचारिक चांगला मार्ग दाखवावयाचे व आपल्या सामाजिक कार्यात सहभागी करून घ्यायचे. विशेष म्हणजे हल्लेखोरांना ते पटत असे आणि ते सत्कर्माला लागत असत.

महात्मा ज्योतिबा फुलेंचा विचार हा खरोखरच महान होता. ते म्हणायचे की आपण सर्व एकच समान आहोत. सर्व ईश्वराचे लेकरे आहोत. मग भेदभाव कशाला ? निसर्गाच्या सर्व निर्मित वस्तूंवर सर्वांचा समान अधिकार आहे. आपल्याला निसर्गाने हवा, सूर्यप्रकाश व पाणी दिले आहे. हे मानव निर्मित नाही. मानव सुद्धा निसर्ग निर्मितीच आहेत. त्यामुळे पृथ्वीवरील सर्व निसर्ग निर्मित हवा, सूर्यप्रकाश व पाण्यावर सर्व मानवांचा समान अधिकार आहे.

हा विचार कोणीही करूच शकत नाही. हा असा विचार फक्त महात्माच करू शकतात. म्हणून तर त्यांना महात्मा पदवी देण्यात आली होती.

पदवी, डिग्र्या व प्रमाणपत्र हे शाळा, महाविद्यालय व संस्था मधून विशिष्ट अभ्यासक्रम पूर्ण केल्यावर मिळतात. परंतु महात्मा ही पदवी सामाजिक कार्य व मानवाचे कल्याण केल्यामुळे त्यांना देण्यात आली. विशेष म्हणजे आज जी महिलांनी शिक्षणात क्रांती आणि प्रगती केली आहे ती केवळ महात्मा फुले यांचीच देणं आहे. म्हणून त्यांना आजच्या दिवशी म्हणजे ११ मे रोजी महात्मा पदवी दिली तरी खरोखर सर्वासाठी प्रेरणादायी आहे. ह्या दिवसाचे स्मरण करणे आपले सर्वांचे कर्तव्य आहे. ह्या दिनाला स्मरून आपण सुद्धा महात्मा होण्याचा दिशेने पाऊल टाकूया.

सत्काराला उत्तर देताना महात्मा फुले म्हणाले होते की, जनी जनार्दन ! संत बोलती उत्तर या वचनाप्रमाणे मी अल्पसे कार्य केले आहे. बघा किती महानता आहे की एव्हढे कार्य करून सुद्धा कृतीत नम्रता आहे. त्यावेळी महात्मा फुलेंच्या जय घोषणे परिसर दुमदुमला होता.

ज्योतिरावांना बडोद्याचे राजे महाराज सयाजीराव गायकवाड व समाजाने महात्मा ही पदवी दिली अपेक्षा करूया त्यांना आपला देश भारतरत्न म्हणून सन्मान देऊन लवकरच गौरवेल अशी सार्थ अपेक्षा करूया.



**अरविंद मोरे**
**नवीन पनवेल (पूर्व)**
**मो. ९८२०८२२८८२.**

## सरु : एका गावातील मुलीची मोठ्या शहरातील स्वप्ने आणि जिद्दीची कहाणी!



**मुंबई, १० मे :** जेव्हा एखादी गावातील मुलगी समाजाने घालून दिलेल्या मर्यादांपलीकडे स्वप्न पाहण्याचे धाडस करते, तेव्हा काय होते? जेव्हा तिची मुळे तिला थांबवण्याचा प्रयत्न करतात, पण तिची महत्त्वाकांक्षा तिला उंच भरारी घ्यायला प्रवृत्त करते? आपल्या प्रभावी कथाकथनासाठी प्रसिद्ध असलेली झी टीव्ही वाहिनी एक नवीन मालिका सादर करत आहे सरु जी तुम्हाला खोलवर प्रेरणा देईल. राजस्थानातील खारेस गावातल्या एका जिद्दी तरुणी सरुच्या प्रवासाची ही कथा असून तिच्या उच्च शिक्षणाच्या स्वप्नांना समाजाकडून वारंवार दडपण्याचा प्रयत्न होतो. प्रेक्षक तिच्यासोबत एका अशा प्रवासावर निघतील जिथे ती स्वतःच्या स्वप्नांसाठी झगडते. गावात मर्यादित संधी, आणि तिच्या बाहेर जाण्याबद्दलची तिच्या आईची अनिच्छा अशा परिस्थितीत सरुचे मुंबईला कॉलेजसाठी येणे हे तिच्या आयुष्यातील एक मोठे वळण ठरते. भावनिक चढउतार, अडचणी, आणि स्वतःच्या ओळखीचा शोध या सगळ्यांनी परिपूर्ण असा हा टप्पा तिला खर्या अर्थाने घडवतो. शशि सुमीत प्रॉडक्शन्स प्रा. लि. निर्मित ही सरु ही मालिका १२ मे २०२५ पासून दररोज संध्याकाळी ७:३० वाजता झी टीव्हीवर प्रसारित होणार आहे आणि प्रेक्षकांना घेऊन जाणार आहे ग्रामीण राजस्थानापासून ते मुंबईच्या गजबजलेल्या शहरी जीवनाच्या प्रवासापर्यंत.

मुख्य भूमिकेत मोहक मटकरचे पदार्पण होत असून तिच्या माध्यमातून आपल्याला भेटतेय सरु एक काटेकोर, आत्मविश्वासू आणि स्वाभिमानी तरुणी, जिचे तिच्या मूल्यांशी घट्ट नाते आहे. ती नीतिमान आणि धीट असली तरी आतून अजूनही थोडीशी भावुक आहे पण कोणत्याही आव्हानामुळे कधीही हार मानत नाही.

सरु ही कबड्डी चॅम्पियन आहे आणि जिल्हाधिकारी होण्याचे तिचे स्वप्न आहे स्वतःसाठी उज्वल भविष्य घडवण्याच्या ध्येयाने ती झपाटलेली आहे. सरुच्या प्रवासात संघर्ष आणि अनिश्चिततेची एक नवी पातळी आणते अनुष्का मर्चंडेद्वारा साकारलेली 'अनिका'. नेहमी लक्षवेधी असण्याचा हट्ट, गोष्टी आपल्या मनासारख्या झाल्या नाही तर त्याकडे अहंकाराने पाहण्याची वृत्ती अशा अनिकाला सरु अजिबात आवडत नाही. सरुला खाली खेचण्याची एकही संधी ती दवडत नाही.

यात शगुन पांडे वेद बिर्ला या नायकाच्या भूमिकेत दिसणार आहे एक सुसंस्कृत, विनम्र आणि सच्च्या मूल्यांवर चालणारा तरुण जो कॉलेजमध्ये प्राध्यापक म्हणून सन्मान प्राप्त करतो. एक समर्पित मुलगा आणि आपल्या वहिनीसाठी खंबीर आधारस्तंभ असलेल्या वेदचे तिच्याशी अतूट मैत्री आणि विश्वासाचे नाते शेअर करतो. स्वतःच्या नैतिक तत्त्वांवर ठाम असलेला वेद परिस्थिती प्रतिकूल असली तरीही नेहमी योग्य गोष्टीसाठी उभा राहतो. ही मालिका नाट्य, प्रेरणा आणि भावना यांचा सुरेख मिलाफ सादर करते.

प्रसारमाध्यमाच्या प्रतिनिधींना सरुच्या जगाची झलक दाखवण्यासाठी मालिकेच्या मुंबईतील लॉन्च कार्यक्रमात राजस्थानातील एका कठपुतळी कलाकारांच्या संघाकडून खास परफॉर्मन्स सादर करण्यात आला. त्यांच्या मनस्पर्शी सादरीकरणाने सरुचा प्रवास जिवंत केला, प्रेक्षकांना मालिकेच्या सांस्कृतिक मुळांशी जोडले आणि सगळ्यांमध्ये मालिकेच्या प्रीमिअरची उत्सुकता आणखी वाढवली.

झी टीव्हीचे चीफ चॅनल ऑफिसर, मंगेश कुलकर्णी म्हणाले, झी टीव्हीवर आम्ही अशी कथानके सादर करण्यास कटिबद्ध आहोत जी केवळ प्रेक्षकांना गुंतवून ठेवत नाहीत, तर त्यांच्या आकांक्षांशीही खोलवर नाते जोडतात. सरु ही मालिका एका गावातील मुलीच्या स्वप्नांचा पाठपुरावा करण्याच्या धाडसाची व समाजाच्या बंधनांना आव्हान देणारी एक ताजी आणि प्रेरणादायक कथा सादर करते. ही मालिका केवळ आपल्या मर्यादांच्या बाहेर पाऊल टाकण्याचा भावनिक प्रवास मांडत नाही, तर गुंतागुंतीच्या व्यक्तिरेखा आणि त्यांच्या नातेसंबंधांचाही सखोल वेध घेते. शशि आणि सुमीत मित्तल या दूरदृष्टी असलेल्या जोडीसोबत काम करत आम्ही अशी एक कहाणी सादर करत आहोत जी आमच्या वैविध्यपूर्ण कॉन्टेन्टचे प्रतीक ठरेल आणि सर्व पिढ्यांमधील प्रेक्षकांशी भावनिक बंध निर्माण करु शकेल.

## उफ्फ ये लव है मुश्किल ... या कौटुंबिक रॉम-कॉममधल्या आपल्या वकीलाच्या भूमिकेसाठी आशी सिंह रात्र-रात्र कोर्टरूम ड्रामा बघत आहे



**मुंबई, १० मे :** विनोद, रोमान्स आणि कौटुंबिक नाट्य यांचे मिश्रण असलेली उफ्फ ये लव है मुश्किल ... ही मालिका त्यातील वेधक कथानकाने प्रेक्षकांचे लक्ष नक्कीच वेधून घेईल. या मालिकेच्या केंद्रस्थानी आहे कैरी शर्मा, जिची भूमिका आशी सिंह करत आहे. कैरी शर्मा एक महत्त्वाकांक्षी आणि होतकरू तरुण वकील आहे. युग (शब्बीर अहलूवालिया) तिच्या आयुष्यात येतो तेव्हा तिच्या जीवनात उलथापालथ होते. स्वतःला सिद्ध करण्यासाठी धडपडणाऱ्या, होतकरू वकीलाची भूमिका आशीने खूप गंभीरतेने घेतली आहे. तिचे चित्रण अस्सल वाटावे यासाठी कायदेविषयक शोज तिने बारकाईने पाहिले. क्लासिक कोर्टरूम शोजपासून कोरियन-कोर्टरूम ड्रामापर्यंत तिने सर्व काही पाहिले आहे.

आपल्या व्यक्तिरेखेत अस्सलता आणण्यासाठी सर्व प्रयत्न करत असलेली आशी सिंह म्हणते, कायद्याची प्रक्रिया जाणून घेण्यासाठी मी खटल्यापासून सुरुवात केली आणि कायदा आणि व्यवस्था यांचा सखोल अभ्यास केला. पण सगळ्यात अनपेक्षित प्रेरणा मला मिळाली ती कोरियन ड्रामा विन्सेन्झो मधून! तो सर्वसामान्य कोर्टरूम ड्रामा नाहीये. त्यातील दोन्ही प्रमुख पात्रे वकील आहेत. वकीलाचा आत्मविश्वास आणि भावनिक संवेदनशीलता यांच्यातील समतोल कसा साधावा हे समजून घेण्यासाठी मला याचा खूप उपयोग झाला. शिवाय, त्या दोघांमधील नोक-झोक मला बरीचशी या मालिकेटल्या कैरी आणि युगच्या नात्यासारखीच वाटली.

या संदर्भांचा चांगलाच उपयोग झाला असावा, कारण अलीकडे प्रदर्शित झालेल्या प्रोमोमध्ये एका वकीलाच्या रूपात आशीचा परफॉर्मन्स चांगलाच खणखणीत आहे आणि तितकाच मोहक देखील! तिचा पवित्रा, तिचे टायमिंग, युक्तिवाद करण्याची पद्धत हे सारे सहज आणि स्वाभाविक वाटते आहे. आशी म्हणते, मला दमदार व्यक्तिरेखा करायला आवडतात. पण कैरी जरा वेगळी आहे. तिच्यात आग आहे, ती हुशार आहे पण ती हृदयाचा कौल घेते. मला माहीत होते की वरवर आत्मविश्वास दाखवून मी ही भूमिका करू शकणार नाही. अनेक कायद्यावर आधारित शोज पाहून मी कोर्टरूमचे वातावरण, तेथील हालचाली बारकाईने पाहिल्या. अजून एक एपिसोड असे म्हणत म्हणत मी रात्री २ वाजेपर्यंत जागत होते. पण त्यामुळे मी कायदेशीर शब्दावलीच्या पलीकडे जाऊ शकले. कैरीसारखे अस्सल, स्वभावात विविध कंगोरे असलेले आणि गुण-दोषांनी युक्त असे पात्र कसे असू शकते हे मला समजू शकले. प्रेक्षक तिला कधी भेटतात आणि मी माझ्या कुवतीने तिचे व्यक्तित्व उभे केले आहे, त्याबद्दल ते काय प्रतिक्रिया देतात हे जाणून घेण्यासाठी मी उत्सुक आहे.

## राशीभविष्य

**मेष :** आज एखाद्या विरोधकाशी किंवा शत्रूशी जुना वाद संपेल. मनं पुन्हा एकत्र येतील. एखाद्या कौटुंबिक मित्रासोबत व्यावसायिक संबंध सुरू होऊ शकतात. कामाच्या ठिकाणी कौतुक केले जाईल.

**वृषभ :** प्रेम प्रकरणात जास्त वादविवाद टाळा. प्रेमसंबंधांमध्ये एकमेकांच्या भावनांचा आदर करा. आज तुम्हाला आरोग्याबद्दल थोडी काळजी वाटू शकते. आजारांची लक्षणे जाणवू शकतात.

**मिथुन :** आज जुन्या मित्राला भेटाल. विद्यार्थ्यांना अभ्यासात रस असेल. कोणत्याही बौद्धिक स्पर्धेत किंवा परीक्षेत तुम्हाला यश आणि आदर मिळेल. एक नवीन औद्योगिक युनिट सुरू केले जाईल.

**कर्क :** बेरोजगारांना रोजगार मिळेल. तुम्ही तुमच्या घरी आणि व्यवसायाच्या ठिकाणी आलिशान वस्तू आणाल. व्यवसाय क्षेत्रात गुंतलेल्या लोकांनी नियोजनबद्ध पद्धतीने काम केल्यास फायदा होईल.

**सिंह :** बहुराष्ट्रीय कंपन्यांमध्ये काम करणाजया लोकांना पदोन्नती मिळण्याचे संकेत मिळत आहेत. कार्यक्षेत्रात सुधारणा होऊ शकते. बजयाच काळापासून सुरू असलेल्या समस्या कमी होतील.

**कन्या :** आज मुलांकडून आनंदात वाढ होईल. परदेशात शिक्षण घेऊ इच्छिणाजयांची इच्छा पूर्ण होईल. ज्यामुळे तो आज आनंदी होईल. प्रेमसंबंधात आकर्षण वाढेल. प्रेमविवाहाची योजना यशस्वी होईल.

**तुळ :** आज उत्पन्नापेक्षा खर्च जास्त असेल. व्यवसायात अपेक्षित उत्पन्न न मिळाल्याने आर्थिक परिस्थितीवर परिणाम होईल. एखाद्या वृद्ध प्रिय व्यक्तीकडून तुम्हाला आर्थिक मदत मिळू शकते.

**वृश्चिक :** घर आणि व्यवसायाच्या ठिकाणी चैनीच्या वस्तूंवर जास्त पैसे खर्च होतील. सरकारी मदतीने वडिलोपार्जित संपत्ती आणि मालमत्ता मिळविण्यातील अडथळा दूर होईल.


**धनु :** राजकारणात पद आणि प्रतिष्ठा वाढेल. कामाच्या ठिकाणी अनावश्यक वाद टाळा. अन्यथा प्रतिमा खराब होईल. आज संपत्तीत वाढ होईल. नोकरीत कामासोबत इतर काही जबाबदारी मिळाल्यास तुमचे उत्पन्न वाढेल.

**मकर :** आज प्रेमसंबंधांमधील तणाव संपेल. तुमची एखाद्या प्रिय व्यक्तीशी भेट होऊ शकते. भावंडांसोबतचे नाते अधिक दृढ होईल. वैवाहिक जीवनात समस्या वाढू शकतात. आज जपून वागा.

**कुंभ :** लोक तुमच्याकडे आकर्षित होतील. तुमच्या महत्त्वाच्या कामात यश मिळण्याची शक्यता आहे. आज जमा केलेल्या भांडवलात वाढ होईल. अनेक वर्षांपूर्वी उधार दिलेले पैसे अचानक परत मिळू शकतात.

**मीन :** आज तुम्हाला दूरच्या देशातील नातेवाईकाकडून चांगली बातमी मिळेल. कुटुंबातील तुमच्या त्यागाची आणि समर्पणाची कुटुंबातील सर्व सदस्यांकडून खूप प्रशंसा केली जाईल.

## शब्दकोडे क्रमांक २१०८



**आडवे शब्द:-**
१) जयप्रकाश नारायण यांना लोकांनी दिलेली पदवी
५) एकादे काम करण्यासाठी समर्थ असलेला
७) पक्षांना फाशात पकडून शिकार करणारा
११) कापडाचा एक हलका प्रकार
१२) थापा मारणारा
१४) चाकर
१६) मान, प्रतिष्ठा
१७) बारीक खडा
१८) विहीरीतून पाणी काढण्याचे एक विशिष्ठ प्रकारचे भांडे
१९) बागेतील वृक्षांची निगा राखणारा
२०) पाणकोंबडा
२३) रम्य
२५) मनाचा ओढा
२६) सन्मानाची अल्प रक्कम
२७) घाई, त्वरा
२८) सावधगिरी
२९) मत्स्य
३१) दुष्ट, भांडखोर
३३) हिंदीत क्षण
३४) ढोंग उघडकीस येणे
३८) गाढव
३९) एक तारवाद्य
४०) हाक, प्रतिसाद
४१) सेवक
४२) गणितातील अधिक
४४) धनुष्यबाण
४७) सवाद्य मिरवणूक
५१) जुनीच्या विरुद्ध
५२) वस्त्राचा शेवटचा भाग
५३) फुरसत
५४) वरपांगी
५५) अंत:करण
५६) गुणांची कदर करणारा
५८) देणारा
५९) यात्रेस जाणे
६०) पोलिस
६२) कसदार
६४) *** माकत
६५) हिंदीत ढग
६६) जनक राजाची मुलगी, सीता
६७) तिबेटी धर्मगुरु
६८) हाकेला दिलेले उत्तर

**उभे शब्द :-**
१) लोखंडाला चिकटणारा
२) हस्त
३) श्वासोच्छ्वासाचा अवयव
४) गोष्टी सांगणे
५) सुताराकडचे एक हत्यार
६) रम्य
७) पुष्कळ
८) फुलाचा एक भाग
९) दात
१०) धैर्य
१३) चबुतरा, कट्टा
१५) युक्ती
१९) आई ** मरो मावशी जगो
२१) चिखलाची भुसभुशीत जमीन
२२) गप्प बसण्याचे व्रत
२४) हद्दपार एक शिक्षा
२६) आई-वडील
२७) एक तंतूमय वनस्पती
२९) एक मराठी महिना
३०) शनीचा त्रासदायक फेरा
३१) काठ बाजू
३२) गमन करणे
३३) परत करणे, परतफेड
३५) निष्णांत, वाकबगार
३६) छाती, वक्ष
३७) दुसऱ्याकरिता केलेला खर्च
३८) वाळा-एक अत्तर
३९) सपाट
४१) दानी, दानशूर
४३) पद्धतीनुसार.
४५) माणूसकी
४६) पळसाचा डिंक
४८) उगवत्या सूर्याचा देश
४९) गावातील सहवासी
५०) उसनवार
५५) मोठा राजा
५७) उष्णता, जळजळीतपणा
५८) दरवाजा
५९) वाद्य वाजविणारा
६१) पती, यजमान
६२) अनर्थ, धक्का
६३) हिंदीत उद्या
६५) लहान मुलगी

(उत्तर उद्याच्या अंकात)

### मागील शब्दकोड्याचे उत्तर




# 'प्री-वेडिंग' शूटसोबत थैलेसेमियाचे समुपदेशन करुन घ्या

**गोंदिया :** ८ मे हा जागतिक थॅलेसेमिया दिवस म्हणून साजरा केला जातो. या दिवशी या आजाराची सर्वांना ओळख करून द्यावी, त्या आजारासंबंधीची माहिती जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोहोचावी आणि त्यामुळे या आजाराचा संपूर्ण नायनाट व्हावा, जग थॅलेसेमिया मुक्त व्हावे, तसेच या आजाराच्या विळख्यातून सर्वांची सुटका व्हावी, यासाठी जनजागृती करण्यात येत आहे. टेस्टमध्ये जर आपण थॅलेसेमिया 'मायनर' निघालात, तर दोनच गोष्टी लक्षात ठेवायच्या. लग्न करताना आपल्या पार्टनरचीही तपासणी करून घ्यायला विसरायचे नाही. डॉक्टरांकडे गेल्यावर तुम्ही थॅलेसेमिया 'मायनर' आहात, हे सांगायला विसरायचे नाही. कारण, हिमोग्लोबिन वाढण्यासाठी लोह किंवा आयर्न देऊनही उपयोग होणार नाही. खूप जेव्हा लोह देऊनही काही जणांचे हिमोग्लोबिन वाढत नाही त्यावेळी मग तेही थॅलेसेमियाची तपासणी करून घ्यायला सांगतात. गरोदरपणात तर सर्वच महिलांची अगदी पहिल्या काही आठवड्यातच ही टेस्ट व्हायला हवी. तुमचे थॅलेसेमिया स्टेटस समजून घेणे आणि त्यावरून तुम्हाला लक्षात येईल की, तुम्ही नॉर्मल तरी असाल, नाहीतर थॅलेसेमिया मायनर तरी असाल थॅलेसेमिया मायनर हा काही आजार नाही, फक्त तुम्ही या गुणसूत्राचे वाहक आहात, इतकेच ! म्हणूनच लग्न कुंडली जुळवून बघून लग्न करण्यापेक्षा आरोग्य कुंडली तपासणी करून लग्न जुळवा, तसेच आवश्यक ती काळजी घ्यावी असे आरोग्य प्रशासनातर्फे हेमेटोलॉजी सेलच्या वैद्यकीय अधिकारी डॉ. सुवर्णा हुबेकर यांनी केले आहे.

# महाबोधी महाविहार बौद्ध समाजाच्या ताब्यात द्या

## शांततामय आंदोलनात आमदार राजकुमार बडोले यांचा सहभाग



### राज्य शासनाशी चर्चा करणार : आ. बडोले

बुद्धगया येथील महाबोधी महाविहार म्हणजे भारतासह जगभरातील बौद्धांचे प्रमुख तीर्थक्षेत्र होय. या महाबोधी महाविहाराचे व्यवस्थापन बौद्धांच्या ताब्यात नाही. ते बोद्धांच्याच ताब्यात असावे, यासाठी विविध बौद्ध संघटनांकडून आंदोलन केले जात आहे. अनेक बौद्ध विहारांमध्येही आंदोलन करून केंद्र सरकारला निवेदन पाठवण्यात आले आहे. दरम्यान सत्ताधारी पक्षाचा आमदार म्हणून या विषयावर राज्यसरकारचे लक्ष्य वेधण्यासाठी शासनाची चर्चा करणार, असे राजकुमार बडोले यांनी सांगितले. तसेच विविध मंत्र्यांची भेट घेऊन १९४९ मध्ये लागू झालेल्या बौद्ध मंदिर कायद्यात सुधारणा करण्याची मागणी देखील करण्यात येणार आहे.

**सडक अर्जुनी :** बौद्धगया येथील महाबोधी महाविहारवरील व्यवस्थापन पूर्णतः बौद्ध समाजाकडे सोपवले जावे आणि बौद्ध धर्माच्या पवित्र स्थळांवर राजकीय किंवा प्रशासकीय हस्तक्षेप थांबवाव, या मागणीला घेवून बोधगया येथे आंदोलन अत्यंत शांततामय वातावरणात सुरू आहे. या आंदोलनाला पाठिंबा देण्यासाठी राज्याचे माजी मंत्री आणि आमदार राजकुमार बडोले यांनी 'धम्मचर्या' दीक्षाभूमी (नागपूर) ते महाबोधी महाविहार, बुद्धगया (बिहार) दरम्यान ऐतिहासिक धम्मयात्रा सुरू केली होती. या यात्रेमुळे नवयुवकांमध्ये बौद्ध विचारधारा अधिक दृढ होईल आणि जागृती निर्माण होणार आहे.

बोधगया मंदिराच्या ऐतिहासिक आणि आध्यात्मिक महत्त्वामुळे संपूर्ण जगभरातील बौद्ध धर्मीयांचे ते श्रद्धास्थान आहे. परंतु १९४९ साली लागू झालेल्या बौद्ध मंदिर कायद्यामुळे या मंदिराच्या व्यवस्थापनात बौद्धांसोबत इतर धर्मीय सदस्यांचाही समावेश करण्यात आला. याला विरोध म्हणून बौद्ध भिक्षूंनी, सामाजिक कार्यकर्त्यांनी आणि विद्यार्थ्यांनी शांततामय आंदोलन बोधगया येथे सुरू केले होते. या आंदोलनाला पाठिंबा देण्यासाठी राजकुमार बडोले फाउंडेशन तर्फे महाराष्ट्रातील बौद्ध उपासक-उपासिकांचा जत्था बोधगया येथे जाऊन आंदोलनात सहभागी झाला होता.

# जि.प.सदस्य पारधी यांच्या पाठपुराव्यामुळे वाहतूक सुरु



**तिरोडा :** तिरोडा-तुसमर मार्ग दुरावस्थेत गेल्यामुळे खडीकरण रुंदीकरण व डांबरीकरणाचे काम युद्धस्तरावर सुरू आहे. मात्र देव्हाडा येथील नागरिकांच्या तक्रारीनुरूप वनविभागाने मार्गावर नालीचे खोदकाम करून वाहतूक बंद केली. परिणामी तिरोडा-तुमसर या मार्गावीरल गावातील नागरिकांना तिरोडा येथे येणाऱ्या गावकऱ्यांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. या बाबीची दखल घेत जि.प. सदस्य किरण पारधी यांनी देव्हाडा येथील सरपंच व वनविभागाच्या अधिकाऱ्यांनी चर्चा करून रस्ता पुन्हा वाहतूकीसाठी सुरू करण्यात आला.

सविस्तर असे की, तिरोडा -तुमसर हा मार्गा दोन जिल्ह्याना जोडणारा मार्ग आहे. या मार्गाने नदी काठावरील गावकरी आपले शेतमाल तिरोडा येथील बाजारपठेते विक्रीसाठी आणत असतात. मात्र अवैधरित्या रेती वाहतूक करणाऱ्या जड वाहनांमुळे या मार्गाची दुरावस्था झाल्याने मार्गाच्या डागडुजीच्या कामाला सुरुवात करण्यात आली असून काम युद्ध पातळी सुरू आहे. मात्र अवैधरित्या रेती वाहतूक होत असल्यामुळे देव्हाडा येथील गावकऱ्यांच्या तक्रारीनंतर वनविभागाच्या वतिने मार्गावर जेसीबीच्या मदतीने मार्गावर नालीचे खोदकाम करून वाहतूक बंद करण्यात आली. यामुळे यामुळे घोगरा, पाटीलटोला, चांदोरी, मांडवी, मुंडीपार, बेलाटी येथील नागरिकांना तिरोडाला जाणे कठीण झाले आहे.

या बाबीती तक्रार जिल्हा परिषद किरण पारधी यांच्याकडे करण्यात आली. दरम्यान त्यांनी पाठपुरावा करीत देव्हाळा सरपंच व मोहाडी तालुका वन विभागाच्या कर्मचाऱ्यांची चर्चा करून रस्ता पुर्ववत करण्याची मागणी केली. दरम्यान रस्ता गावकऱ्यांसाठी सुरू करण्यात आला आहे. यावेळी सरपंच प्रिती भांडारकर, अशोक भांडारकर व गावकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. दरम्यान गावकऱ्यांनी जि.प. सदस्य किरण पारधी यांचे आभार व्यक्त केले.

# राष्ट्रीय मूलनिवासी महिला संघाचे जिल्हा अधिवेशन

**गोंदिया :** माता अहिल्याबाई होळकर यांच्या त्रिशताब्दी जयंती वर्षपूर्तीनिमित्त राष्ट्रीय मूलनिवासी महिला संघ, भारत मुक्ती मोर्चा महिला विंग, व बहुजन क्रांती मोर्चा महिला विंग व तसेच बहुजन मुक्ती पार्टी महिला विंग यांच्या संयुक्त विद्यमाने महिलांचे जिल्हा अधिवेशन १० मे ला मैत्रीय बुद्ध विहार भीम नगर गोंदिया येथे सकाळी ११वाजेपासून आयोजित करण्यात आला आहे.

या जिल्हास्तरीय अधिवेशनात मूलनिवासी महानायकांच्या जीवन चरित्रातून प्रेरणा घेऊन वैचारिक सक्षम झाल्याशिवाय महिला सक्षमीकरण शक्य नाही, लोकप्रिय योजनांमुळे महिलांचे सक्षमीकरण होणे शक्य नाही, महिलांचे राष्ट्रव्यापी संघटन बनवल्याशिवाय महिलांच्या समस्यांचे समाधान शक्य नाही अशा अनेक विषयांवर चर्चा होणार आहे. अधिवेशनाच्या अध्यक्षस्थानी प्रा. सुचिता खोब्रागडे, डॉ. सविता बेदरकर, मुख्य अतिथी ॲड. पिंकी देशमुख, वर्षा सुखदेवे, वंदना डोंगरे उपस्थित राहणार आहेत. वक्त म्हणून प्रा. दिशा गेडाम, माया हिरके, इंजि. यामिनी लिल्हारे, अनिता दुधबुरे, शबाना अन्सारी, लक्ष्मी राऊत, वनिता शिरसाव, सोनकुवर कुंभरे, सतीता जांभुळकर, शालिनी बोरकर, पौर्णिमा जनबंधु व सुहानी मेश्राम उपस्थित राहणार आहेत. सदर अधिवेशनात महिलांनी जास्तीत जास्त संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन महिला संघाच्या वतीने करण्यात आला आहे.

# तथागत गौतम बुद्ध व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या मूर्तीचे अनावरण 12 मे रोजी

## बौद्ध पौर्णिमानिमित्त विविध कार्यक्रमाचे आयोजन



**देवरी :** बुध्द पोर्णिमेच्या पर्वावर वार्ड क्र. १३ येथील ऊरूवेलावन बुध्द विहारात बुध्द विहार समिती च्या वतीने थईलैंड येथे अष्ठधातुपासून तयार करण्यात आणलेल्या तथागत गौतम बुद्ध व विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पंचधातु मूर्तीचे अनावरण कार्यक्रमाचे आयोजन १२ मे रोजी सकाळी ९ वाजे करण्यात आले आहे. दरम्यान समितीच्या वतिने विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आला आहे.

कार्यक्रमाची सुरुवात धम्म ध्वजारोहन, सामुहिक बुध्द वंदना,सकाळी १०.३० वाजेपासून लहान मुलांकरीता प्रश्न मंजुषा, दुपारी ४ वाजता तथागत बुध्द व डॉ. आंबेडकर यांच्या मुर्तीसह शांती कॅंडल रैली, सायंकाळी ६.३० वाजता दोन्ही मुर्तीचे विधीवत अनावण व परित्राणपाठ भन्ते भदंत संघधातु स्थवीर व मुलगंधकुटी बुध्द विहार देवरीचे पुज्य भन्ते परमपदा यांच्या हस्ते होणार आहे. सदर कार्यक्रमाच्या अध्यक्षसूथानी सेवानिवृत्त प्राचार्य के.सी. शहारे, नगराध्यक्ष संजु ईके, जि.प.सदस्य उषा शहारे, कल्पना वालोदे, चरणदास उंदिरवाडे, नितेश वालोदे आदी उपस्थित राहणार आहेत. दरम्यान रात्री ८.३० वाजे स्मृतीशेष रविकांता शहारे यांच्या प्रित्यर्थ खामखुर्रा येथील शंकर शहारे यांचे कडुन भोजनदान व रात्री ९ वाजता भिमगितावर आधारीत संगीतम भिमगितांचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे.

तरी या कार्यक्रमात परीसरातील बौध्द समाज व इतर समाज बांधवानी जास्तीत जास्त संख्येत सहभागी व्हावे, असे आवाहन ऊरूवेलावन बौद्ध विहार समितीच्या वतीने करण्यात आले आहे. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी समितीचे अध्यक्ष जयपाल शहारे, उपाध्यक्ष शालीकराम शहारे, सचिव राजकुमार साखरे, सहसचिव चेतन कोचे, कोषाध्यक्ष मनोहर तागडे यांच्यासह समितीचे पदाधिकारी व सदस्य सहकार्य करीत आहेत.

## रस्ता ओलांडताना काळजी घ्या

**गोंदिया :** मागील काही वर्षांमध्ये मोबाइल प्रत्येक नागरिकांचा अविभाज्य घटक झाला आहे. मोबाइल वापरण्याचे जेवढे फायदे आहेत, तेवढेच तोटेसुद्धा आहेत. त्यामुळे अनावश्यक मोबाइल वापरणे टाळले पाहिजे असे बोलल्या जात आहे.

विशेषतः वाहन चालविताना, रस्ता ओलांडतानाही काही जण मोबाइलवर बोलत असतात. अशावेळी अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही. किमान स्वतःच्या जीवाचा तरी विचार केला पाहिजे. शहरातील काही चौकांमध्ये अनेक मोबाइल वापरकर्ते रस्ता ओलांडतानाही मोबाइल कानालाच लावून रस्ता ओलांडताना दिसून येतात. मोबाइलवर जास्त वेळ बोलल्याने ऐकण्याच्या क्षमतेवरही परिणाम होतो. यामुळे बहिरेपणा येऊ शकते. खरं तर मोबाइलमधून बाहेर पडणाऱ्या लहरी कानाच्या नाजूक ऊतकांना नुकसान पोहोचवतात. त्यामुळे कानाच्या आतील भागावर सर्वाधिक परिणाम होतो.

# ग्रा.पं.कर्मचाऱ्यांचा जिल्हा अधिवेशन १० मे रोजी

**सडक अर्जुनी :** महाराष्ट्र राज्य ग्रामपंचायत कर्मचारी महासंघ (आयटक संलग्न ) द्वारे २० मे रोजी सकाळी ११ वाजेपासून तेजस्विनी लॉन सडक अर्जुनी येथे जिल्हा अधिवेशन आयोजित करण्यात आले आहे. कार्यक्रमाचे उद्‌घाटन शेतमजूर युनियनचे सरचिटणीस शिवकुमार गणवीर यांच्या हस्ते करण्यात येणार आहे.

यावेळी आयटकचे राज्य उपाध्यक्ष हौसलाल रहांगडाले, मिलिंद गणवीर, सचिव रामचंद्र पाटील, विवेक काकडे, शालु कुथे, वर्षा पंचभाई, करुणा गणवीर, लिलता राऊत, पौर्णिमा चुटे, अशोक मेश्राम, चत्रुगण लांजेवार, कयुम शेख आदी उपस्थित राहणार आहेत. अधिवेशनात जिल्ह्यातील कर्मचाऱ्यांचे प्रश्न , मागण्या, ऑनलाईन वेतन प्रणाली मध्ये येणाऱ्या अडचणी, किमान व वेतन, भत्ता, पीएफ, सेवा सर्तीची अंमलबजावणी, यावलकर समितीच्या सिफारशी अनुसार वेतन श्रेणी, पेन्शन, आकृतीबंधात सुधार , उत्पन्न और वसुलीची अट रद्द करुण वेतनावर शंभर टक्के अनुदान राज्य शासनाने देने सरकार सह इतर महत्वाच्या मागाण्यांना घेवून २० मेपासून राज्याचे ग्रामविकास मंत्रीयांचे सातारा येथील जनसंपर्क कार्यालयावर बेमुदत धरणे आंदोलनात शामिल होण्याचे का नियोजन व संघटनात्मक तथा आंदोलनात्मक कार्याची रूपरेषा निश्चित केली जाईल.

# जलयुक्त शिवारची १७२७ कामे पूर्ण

## ८९६० हेक्टरला होणार संरक्षित सिंचन




**गोंदिया :** जिल्ह्यात जलयुक्त शिवार अभियान २.० अंतर्गत २०८५ कामे मंजूर करून ही कामे पावसाळयापूर्वी पूर्ण करण्याचे उद्दिष्ट जलसंधारण विभागाला देण्यात आले होते. यापैकी ७मेपर्यंत एकूण १७२७ कामे पूर्ण पूर्ण करण्यात आली आहे. तर उर्वरित कामे प्रगतिपथावर असून, या कामांमुळे ८९६० हेक्टरला संरक्षित सिंचनाची सोय होणार आहे. पावसाळा सुरू होण्यापूर्वी ही कामे पूर्ण करण्यासाठी जलसंधारण विभागाकडून सातत्याने आढावा घेतला जात आहे.

वातावरण बदलाचा कृषी क्षेत्रावर झपाट्याने परिणाम होत आहे. अनियमित पाऊस आणि निसर्गाच्या लहरीपणामुळे शेती तोट्याचा सौदा होत चालली आहे. त्यामुळे ही परिस्थिती बदलण्यासाठी जलयुक्त शिवारअंतर्गत जलसंधारणाच्या कामावर भर दिला जात आहे. याच अभियानांतर्गत सन २०२४-२५ करिता २०८५ कामे मंजूर करण्यात आली होती. यातर जवळपास ४० कोटी रुपयांचा निधी खर्च केला जाणार आहे. ७ मेपर्यंत जिल्ह्यात १७२७ कामे पूर्ण करण्यात आली असून, यासाठी आतापर्यंत १५ कोटी ६५ लाख रुपयांचा निधी प्राप्त झाला आहे. तर आणखी २० कोटी रुपयांच्या निधीची मागणी जलसंधारण विभागाने शासनाकडे केली आहे.

# बसस्थानकात स्वच्छतेचा बोजवारा; निरीक्षणात धक्कादायक त्रुटी




**आमगाव :** 'हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे स्वच्छ, सुंदर बसस्थानक अभियान - २०२५' अंतर्गत बसस्थानकांना स्वच्छतेच्या निकषांवर उच्च मानांकन मिळवून देणे आणि प्रवाशांसाठी शिस्तबद्ध व स्वच्छ सुविधा निर्माण करणे हा आहे. दरम्यान ८ मे २०२५ रोजी आमगाव बसस्थानकाचे पहिल्या टप्प्यातील सर्वेक्षण करण्यात आले. यावेळई सर्वेक्षणात बसस्थानक परिसरातील अनेक भाग स्वच्छ असल्याचे दिसले, मात्र सार्वजनिक प्रसाधनगृहाची अत्यंत घाणेरडी, दुर्गंधीयुक्त व अस्वस्थ करणारी अवस्था ही सर्वेक्षणाच्या केंद्रस्थानी ठरली. सुविधा असूनही स्वच्छतेकडे दुर्लक्ष होत असल्याची बाब दिसून आली.

या पाहणीसाठी चंद्रपूर विभागीय समितीच्या अध्यक्षा व विभागीय कर्मचारी अधिकारी सौ. रोहिणी पुन्नमवार, समिती सचिव व विभागीय वाहतूक अधीक्षक सौ. प्रांजली थोटे,निरीक्षण केले. यावेळई राज्य परिवहन भंडारा विभागाचे कामगार अधिकारी पराग शंभरकर व वाहतूक नियंत्रक शामलाल मेश्राम देखील उपस्थित होते. त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांचे लक्ष याकडे वेधून तात्काळ स्वच्छता मोहिम राबवण्याची गरज अधोरेखित केली.

विभागीय समितीने निरीक्षणाचा सविस्तर अहवाल वरिष्ठ पातळीवर सादर करण्याचे ठरवले असून, या अहवालाअंतर्गत पुढील उपाययोजना आणि सुधारणा अपेक्षित आहेत. स्वच्छ भारत अभियानाचे ध्येय केवळ घोषणांपुरते मर्यादित न राहता, प्रत्यक्ष कृतीतून दिसून यावे, यासाठी स्थानिक यंत्रणांनी सक्रिय आणि सजग राहणे अत्यावश्यक आहे. आमगांव बसस्थानकाला खरोखरच 'स्वच्छ, सुंदर व दर्जेदार' बनवायचे असल्यास प्रशासनाने आता दुर्लक्ष न करता तातडीने सुधारणा करणे गरजेचे आहे.

# २८७ वर्गखोल्या दुरुस्तीच्या प्रतीक्षेत

**गोंदिया :** जिल्ह्यात सन २००० मध्ये बांधण्यात आलेल्या वर्गखोल्यांना २५ वर्ष झाले. परंतु, त्या इमारतींवर आता लाखो रूपये खर्च करून डागडुजी करण्याची गरज आहे. वादळ, पाऊस, उन्हाळा या तिन्ही ऋतूंच्या झळा सोसणाऱ्या इमारती जीर्ण झाल्या आहेत. दर १० वर्षांनी शाळांच्या इमारतीची डागडुजी करणे आवश्यक आहे. परंतु, जिल्ह्यात जिल्हा परिषदेच्या ६० पेक्षा अधिक शाळांमधील २८७ वर्गखोल्या नादुरुस्त आहेत. त्यामुळे या वर्गखोल्या निर्लेखित करण्यात आल्या असून, त्यात विद्यार्थ्यांना बसविण्यात येत नसल्याचे सांगण्यात आले. मात्र, या कारणामुळे वर्गखोल्या कमी झाल्याने ज्ञानार्जनावर परिणाम होत असून, ग्रामीण भागातील विद्यार्थी व त्यांच्या पालकांमधून नाराजीचा सूर उमटत आहे.

जिल्ह्यातील आठही तालुक्यांमधील जिल्हा परिषदेच्या १६४४ शाळांमधून लाखो विद्यार्थी शिक्षणाचे धडे गिरवत आहेत. या शाळांना दर्जेदार इमारती मिळाव्यात, वर्गखोल्यांची स्थिती उत्तम असायला हवी, अशी अपेक्षा पालकांमधून व्यक्त होत आहे. मात्र, त्याकडे प्रशासकीय यंत्रणेचे दुर्लक्ष होत आहे. दरम्यान, सद्यःस्थितीत २८७वर्गखोल्यांची दुरुस्ती प्रलंबित असून संबंधित सर्व वर्गखोल्या निर्लेखित करण्यात आल्या आहेत. जिल्हा नियोजन समितीकडे दुरुस्तीसाठी ३० कोटी रुपयांच्या निधीची मागणी करण्यात आली आहे.

# दादरीवाल यांची सीपीई समितीमध्ये निवड

**गोंदिया :** येथील वरिष्ठ चार्टर्ड अकाउंटंट दिनेश दादरीवाल यांची नवी दिल्ली येथील द इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकाउंटंट्स ऑफ इंडिया (आयसीएआय) च्या सीपीई केंद्रीय समितीवर एकमताने निवड झाली आहे. ही समिती देशभरातील चार्टर्ड अकाउंटंट्सना अद्ययावत कायदेशीर आणि व्यवसाय माहिती पुरवते, सेमिनार आयोजित करते आणि नियमांचे पालन करण्यासाठी मार्गदर्शन करते.

गोंदियातील सीए समुदायासह भाजप कार्यकर्ते आणि समाजातील अनेक मान्यवरांनी दिनेशजींचे या उल्लेखनीय कामगिरीबद्दल अभिनंदन केले.दिनेशजींच्या निवासस्थानी भाजप युवा नेते विनोद चांदवानी (गुड्डू), सुनील संभावनी, सोनू केशवानी, शाम वाधवानी, सीए अमित भाग्यवानी, सीए दीपक गलानी यांच्यासह अनेक सामाजिक कार्यकर्ते आणि हितचिंतकांनी पुष्पगुच्छ देऊन त्यांचे अभिनंदन केले. याप्रसंगी, सीए दिनेशजी दादरीवाल म्हणाले की, सीपीई समितीच्या माध्यमातून ते व्यावसायिकांना जास्तीत जास्त माहिती देण्यासाठी, सेमिनार आयोजित करण्यासाठी आणि व्यापारी वर्गाच्या समस्या सरकारपर्यंत पोहोचवण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करतील. गोंदियाला त्यांच्या सन्माननीय निवडीचा अभिमान आहे.

# देवरी तालुक्याची वीज समस्या लवकरच सुटणार

## १३२ केव्ही उपकेंद्रासाठी आ. फुके यांचा पुढाकार

**गोंदिया :** देवरी येथे प्रस्तावित १३२ केव्ही वीज उपकेंद्र गेल्या अनेक वर्षांपासून प्रलंबित आहे. या भागात सातत्याने कमी दाबाचा वीज पुरवठा होत असल्याने नागरिक, शेतकरी आणि उद्योजक मोठ्या अडचणीत सापडले आहेत. त्यामुळे या भागातील वीज समस्या दूर करण्यासाठी देवरी येथे १३२ केव्ही उपकेंद्र उभारणे अत्यंत आवश्यक आहे, अशी मागणी आमदार डॉ. परिणय फुके यांनी मुख्यमंत्री तथा ऊर्जामंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली होती. या मागणीची दखल घेत मुख्यमंत्र्यांनी ऊर्जा विभागातील अधिकाऱ्यांना तत्काळ कार्यवाहीचे निर्देश दिले आहेत. यामुळे देवरी आणि चिचगड भागातील वीज समस्या लवकरच सुटणार आहे.

सध्या देवरी व चिचगड भागात कमी दाबाचा वीज पुरवठा होत असल्याने पिण्याच्या पाण्याच्या टाक्या वेळेवर भरत नाहीत, तर



शेतकऱ्यांच्या पाण्याच्या पंपवरही याचा मोठा परिणाम होतो. शेतीला आवश्यक असलेल्या सिंचनाच्या वेळा चुकत असून घरगुती व औद्योगिक वीजपुरवठ्यातही व्यत्यय येतो. या विषयावर आमदार डॉ. परिणय फुके यांनी अनेक वेळा संबधित अधिकाऱ्यांकडे पाठपुरावा केला असून, नागरिकांच्या सातत्याने वाढणाऱ्या तक्रारींचा आढावा घेत मुख्यमंत्री फडणवीस यांच्याकडे पत्राद्वारे सविस्तर माहिती दिली. देवरी तालुक्यातील सर्वच गावांमध्ये विशेषतः देवरी व चीचगडमध्ये उपकेंद्र उभारल्यास वीज दाबाचा प्रश्न कायमचा सुटेल, असे त्यांनी नमूद केले. मुख्यमंत्र्यांनी ही बाब गांभीर्याने घेत ऊर्जाविभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना त्वरीत कार्यवाही करण्याचे आदेश दिले. त्यामुळे देवरी व परिसरातील नागरिकांना दिलासा मिळणार असून, पिण्याचे पाणी, शेतीसाठी पाणी आणि इतर वीज गरजांसाठी स्थिर आणि पुरेसा पुरवठा होणार आहे.

RNI No.- MAHAMAR-2010/35801
महासागर भंडारा
**मालक, मुद्रक, प्रकाशक** - श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर - १८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, गांधी चौक समोर, भंडारा येथे प्रकाशित केले. **संपादक** - श्रीकृष्ण तनसुखदास चांडक मुख्य कार्यालय फोन - ०७१२-२७६७६२८-९३७३११७०४२ * स्थानिक संपादक-**सुरेश लक्ष्मण कोटगले,** फोन -८७९३१९१२१३ * (पी.आर.बी.कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांचेवर राहील.)




# आठ हजार मुलींचा बापमाणूस .. डॉ. हेमंतराजे गायकवाड

'श्री शिवाजी ज्ञानपीठ (इंटरनॅशनल)' ची स्थापना करून छत्रपती शिवाजी महाराजांचे चरित्र आणि विचार यांचा अभ्यास आणि प्रचार करणारे मुंबई दादरमधील डॉ. हेमंतराजे गायकवाड त्यांच्या 'शिवाजी महाराज द ग्रेटेस्ट' मराठी, हिंदी, इंग्रजी, कन्नड, संस्कृत या भाषांत बेस्ट सेलर ठरलेल्या ग्रंथामुळे महाराष्ट्रात परिचित आहेत.

परंतु त्याअगोदर ते गेल्या ३० वर्षांपासून स्वतःच्या पायावर उभे राहिलेल्या १८ वर्षांवरील आठ हजाराहून अधिक कुटुंबवत्सल मुलींचे बाप बनले आहेत..... काय? विश्वास नाही बसत का ? पण हे खरं आहे. आईविना पुरुषाने बाळाच्या पालकत्वाची जबाबदारी घेऊन जन्मापासून बाळ वाढविणे हे आपल्या समाजाला सवयीचे झाले आहे.

आताचे शतक हे तंत्रज्ञानाचे, अद्ययावत कॉम्पुटरचे शिक्षण घेऊन उत्तमोत्तम नोकरी पटकावण्याचे. परंतु उच्च शिक्षण घेऊनही गलेलठ्ठ पगार आणि त्यातून आर्थिक स्थैर्य मिळेल की याची कुणालाही खात्री नाही. अशावेळी वयाची पंच्याहत्तरी गाठलेल्या डॉ हेमंतराजे गायकवाड या व्यक्तीने मुलींच्यातील न्यूनगंड घालवून हजारो लेकींना आर्थिक स्थैर्य आणि सुखासमाधानाने जगण्यासाठी सशक्तपणा दिला आहे.

डॉ. हेमंतराजे हे पुणे जिल्ह्यातील शिरूर तालुक्यातील एका सधन घरातले. सेंट झेव्हियर्स मध्ये शिक्षण घेऊन ते ग्रँट मेडिकल कॉलेजमधून MBBS DOMS झाले. विद्यार्थीदशेत कॉलेज / विद्यापीठ स्पर्धांमध्ये वादविवाद, रॉक - क्लायंबिंग आणि बॅडमिंटनमध्ये यामध्ये अनेक बक्षिसे जिंकताना रावबहादूर मणियार त्वचा आणि लैंगिक रोगासाठी पुरस्कार, बी. बी. योध संशोधन फेलोशिप, बॉम्बे मेडी मीटमधील पारितोषिक पेपर हे पुरस्कार मिळाले.

१९८० मध्ये त्यांच्या इंटर्नशिप दरम्यान त्यांनी पनवेल तालुक्यातील चिरनेर ग्रामीण वैद्यकीय केंद्राची स्थापना केली जे चाळीस खाटांचे ग्रामीण रुग्णालय बनले. याठिकाणी त्यांनी काळवेळ न पाहता गोरगरिबांसाठी रुग्णसेवा केली. नेत्ररोग तज्ज्ञ म्हणून अनेकांना दृष्टी दिली. अनेक वैद्यकीय शिबिरे घेतली.

त्यासाठी राज्यपालांच्या संयुक्त समितीने त्यांना राजीव गांधी शिरोमणी पुरस्कारप्रदान करण्यात आला. त्यांना देशसेवा करण्याची तीव्र इच्छा होती आणि गणवेशावरील प्रेम पूर्ण करण्यासाठी १९८६ मध्ये ते होमगार्डमध्ये वैद्यकीय अधिकारी म्हणून रुजू झाले आणि २००४ मध्ये ते बृहन्मुंबईचे कमांडंट झाले. त्सुनामीच्या काळात केलेल्या कार्याबद्दल त्यांचे कौतुक झाले होते. त्यांनी महिला प्रवाशांचा छळ आणि विनयभंग रोखण्यासाठी रेल्वे सुरक्षा पथक सुरू केले.

२६ /११ च्या मुंबई शहरावर झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर विशेषतः महत्त्वाच्या असलेल्या मुंबईच्या किनारपट्टीचे रक्षण करण्यासाठी त्यांनी मच्छिमारांची होमगार्ड म्हणून नोंदणी केली. १९९७ मध्ये स्वतंत्र सुवर्ण जयंती पदक, २००६ मध्ये महाराष्ट्र राज्य होमगार्ड हिरक जयंती पदकाने त्यांना गौरविण्यात आले.

पहिल्या तीन मुंबई मॅरेथॉनच्या आयोजनातही त्यांचा मोलाचा मुख्य वाटा आहे. पल्स पोलिओसाठी WHO ने त्यांचे कौतुक केले आहे. त्यांना लायन्स क्लब इंटरनॅशनलतर्फे उत्कृष्ट प्राचार्य पुरस्कार प्रदान करण्यात आला. त्यांना भारतीय चिकीत्सा रत्न पुरस्कारही मिळाला आहे. पं. जवाहरलाल नेहरू संस्थापक अध्यक्ष असलेल्या भारत सेवक समाजाचे प्रादेशिक अधिकारी (महाराष्ट्र) म्हणून त्यांनी पद भूषविले.

यानंतर १९८८ मध्ये त्यांनी पॅरामेडिक्सला प्रशिक्षण देण्यासाठी सुरुवात केली. सरकारी रुग्णालयांसाठी परिचारिका, लॅब अस्टिटंट व इतर महत्वाच्या कामासाठी मुलींना प्रशिक्षित करण्यास सुरुवात केली. लोकांची सेवा करण्याची तीव्र इच्छा असणाऱ्या मुलींना स्वतःच्या पायावर उभे केले.

१२ वी पास होऊन महाविद्यालयातून जीवनाची दिशा शोधण्यासाठी बाहेर पडणाऱ्या मुलींसाठी डॉ. हेमंतराजे यांनी १९९६ मध्ये डॉ. गायकवाड्स इन्स्टिट्यूट ही नोंदणी संस्था सुरु केली. व्यवसायाचे स्वरूप म्हणून सुरु केलेल्या या संस्थेच्या स्थापनेपासूनच सर्वच विद्यार्थिनींना आपल्या पोटच्या मुलीप्रमाणे त्यांनी आस्थेने शिक्षण दिले.

मुलींचे शैक्षणिक संगोपन करताना त्यांना सुरक्षित वाटणं, त्यांच्या आकांक्षांना नवे पंख फुटणे फार महत्त्वाचं असतं. सातत्याने त्यांनी प्रॅक्टिकल करून घेतल्या. नर्सिंग होमसाठी स्वाध्याय म्हणून वीस नियमावली लिहिल्या. प्रत्येक विषय पुन्हा पुन्हा समजून सांगितला. त्यामुळे आज डॉ हेमंतराजे हे यशस्वी झालेल्या सर्व मुलींसाठी शिक्षक न ठरता एक आदर्श पिता ठरले आहेत.

जेव्हा आपले शिक्षकच वडिलांच्या



रूपात आपल्यामागे ठामपणे आहेत याची हमी मुलीला असते तेव्हा तिच्यात आत्मविश्वास निर्माण होतो. डॉ. हेमंतराजे यांची बाप बनण्याची कहाणीही काही अशी निराळीच आहे.

डॉ. हेमंतराजे यांच्याकडे आयुष्य घडविलेल्या मुलींचे जैविकदृष्टया रक्ताचे नाते असलेले वडील वेगवेगळे असतील. परंतु या सगळ्याजणींसाठी डॉ. हेमंतराजे हे त्यांच्या आयुष्याला वेगळी दिशा देणारे बाप ठरले आहेत.

आपण एक व्यावसायिक डॉक्टर किंवा शिक्षक नसून वैद्यकीय क्षेत्रात जाऊ इच्छिणाऱ्या मुलींचे आयुष्य घडविणारे बाप आहोत हे त्यांनी प्रथम स्वतःच्या मनावर बिंबवले. मुलीचा बाप होणे फार अवघड असते हे त्यांना सुरुवातीला लक्षात येऊ लागले. मात्र नंतर अंतर्मनाला बजावले, पैसा महत्वाचा नाही तर आपल्याकडे येणाऱ्या प्रत्येक मुलीचे

**रवींद्र मालुसरे**
**अध्यक्ष**
**मराठी वृत्तपत्र लेखक संघ मुंबई.**
**९३२३११७७०४**

आपल्याला आयुष्य घडवायचे आहे.

फणसाला कितीही काटे असले तरी आत गरे गोड असतात. डॉ. हेमंतराजे काहीसे असेच आहेत. सर्व मुलींना त्यांची आदरयुक्त भीती वाटत असते. त्यासाठी या बापमाणसाला समजवून घ्यायला हवं.

हा बाप वरून शिस्तप्रिय असला तरी स्वतःच्या आवडी निवडी व्यक्त न करता मुलींच्या वेळप्रसंगी आवडी निवडी, हट्ट पुरविणारा, परंतु मी तुमच्यासाठी आधार आहे हे सुद्धा त्यांनी मुलींवर बिंबवले.

एका लेकीचा बाप होणं आणि बापाचं काळीज असणारी लेक होणं हे फक्त त्या बाप लेकीच्या नात्यालाच ठाऊक असतं. असं नातं निर्माण झालं तरच आपल्या मनातले इप्सित साध्य होईल हे ओळखून डॉक्टरांनी मनाशी निश्चय केला यापुढे शिक्षणाचे धडे देताना आपल्याला प्रत्येकवेळी कठोर व्हावे लागेल.

हे करताना आपल्याकडे शिक्षण घेतलेल्या मुलींचा मानसिक आणि





भावनिक विकास कसा होईल याकडे त्यांनी सुरुवातीला लक्ष द्यायला सुरुवात केली. मुलींमध्ये आत्मविश्वास आणि धैर्य हे वडिलांशी असलेल्या चांगल्या नात्यातूनच निर्माण होतं. नोकरीसाठी असणारे आवश्यक ते धडे देताना त्यांनी या मुली मानसिकदृष्ट्या कशा सक्षम होतील याचेही वर्ग घेण्यास सुरुवात केली.

समाजात वावरताना कोणत्याही दडपणाखाली किंवा न्यूनगंड मनात ठेवून वावरू नका. कधीही लाचार व्हायचं नाही. स्वाभिमानानं जगायचं. हे क्षेत्र समाजसेवेचे आणि लोकांना मानसिक आधार देण्याचे आहे हे सदैव लक्षात ठेवा. असा मंत्र प्रत्येकीला दिला.

डॉक्टर हेमंतराजे यांनी स्वतः आदर्शवादी जीवन शिस्तीने जगण्याचे तत्व अंगिकारले होते. त्यामुळे आपल्या संस्थेतील मुलींवर योग्य संस्कार करण्याबरोबर तिला उत्तमोत्तम शिक्षण देऊन तिच्या पायावर उभी करणे हे कर्तव्य त्यांनी पार पाडले. याचा परिणाम असा झाला की मुलींना आयुष्याच्या प्रत्येक टप्प्यावर कोणतीही अडचण आली नाही.

घरात एका मुलीचा जन्म झाल्यावर सर्वाधिक आनंद तीच्या बापाला होत असतो. लेक जर घराचे सौख्य असेल तर त्या सौख्याचे पावित्र्य तिचा बाबा असतो. बोट धरून चालायला शिकवणारा बाबा असतो, लेकीच्या हट्टासाठी घोडा होणाराही बाबा असतो. कामावरून येताना रोज न चुकता खाऊ आणणाराही बाबाच असतो. लेकीचे पहिले बोबडे बोल, तिने टाकलेले पहिले पाऊल, तिचे लाडिक वागणे, तिची घरभर पैंजणांची छुमछुम हे सगळे पाहून सुखावतो तो बाबा असतो आणि लेकीला नाजूक कळीसारखा सांभाळणारा आणि प्रसंगी रागे भरणारा पण बाबाच असतो. म्हणूनच म्हणतात ना बाप-लेकीच्या नात्याला कसलीच तोड नसते.

लेकीच्या प्रत्येक सुखासाठी झटणाराही बाबा शेवटी मुलगी म्हणजे परक्याचे धन हे कटू सत्य पचवणारा बाबा ज्या वेळी तो




आपल्या लाडक्या लेकीसाठी अनुरूप जोडीदाराच्या शोधासाठी तो बाहेर पडतो, त्या वेळी त्याला दाहक सामाजिक वास्तविकतेचे चटके बसू लागतात.

मुलीचे लग्न म्हणजे 'कर्जाचा डोंगर' ही वस्तुस्थिती आजही बदललेली नाही. जग बदलतयं, समाजही आधुनिक होतोय असं म्हणतात. पण समाजव्यवस्थेने दिलेलं 'मुलीचा बाप' हे नातं तो ओज्यासारखं वाहताना दिसतो आहे.

या संदर्भात केलेल्या राज्यस्तरीय सर्वेक्षणात उच्चवर्गीयांपासून ते मागावसर्गीयांपर्यंत आणि सधनांपासून ते दारिद्र्यरेषेखालच्या कुटुंबापर्यंत लग्नाचा खर्च मुलीच्या वडिलांनाच करावा लागत असल्याचे दिसतेय. महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात नांदणाऱ्या अठरापगड जातीजमाती आणि धर्मात आजही मुलीच्या लग्नाचा खर्च ही वधुपित्याचीच जबाबदारी मानली जात आहे.

बऱ्याच वडिलांना तर ऋण काढून लग्न करण्याशिवायही पर्याय नसतो. अगदी मध्यमवर्गीय वा निम्नमध्यमवर्गीय कुटुंबांमध्येही आज मुलीच्या लग्नापोटी पाच ते सात लाख रुपये खर्च आणि सुमारे तेवढेच तोळे सोनं, असे समीकरण महाराष्ट्रात कायम आहे.

हे ओळखून डॉ. हेमंतराजे गायकवाड यांनी आपल्याकडे प्रवेश घेतलेल्या मुलीने लग्नवेदीच्या पाटावर उभे राहण्यापूर्वी कधीही कुणाही समोर हात पसरू नये. स्वकमाईने लग्नाला सामोरे जावे यासाठी इन्स्टिट्यूटमध्ये १८ वर्षांच्या विद्यार्थिनीने प्रवेश घेतल्यानंतर त्यांना सर्टिफिकेट व नोकरीची १००% लेखी हमी दिली.

२० ते २३ वर्षांचे असताना काम केले तर सुमारे रु. १५,०००/- महिन्याप्रमाणे ३६ महिने रु. ५,४०,०००/- ही रक्कम त्यांना मिळते. या रकमेत त्यांचा लग्नाचा खर्च निभावतो. क्लास ३ तास २५ दिवस = ७५ ७ ४ महीने ३०० तास, प्रॅक्टिकल २० महिने २५ दिवस ७ ८ तास = ४००० ५००० तासांचा क्लास, प्रदीर्घ अनुभव. ट्रेनिंग दोन भागात असते.

पहिले क्लासरूम ट्रेनिंग जे चार माहिने चालते व नंतर प्रॅक्टिकल ट्रेनिंग जे २० माहिने चालते.

नेत्र तज्ञाला ऑप्टोमेट्रीस्ट ऑप्टिशन, एक्स रे तज्ञाला एक्सरे टेक्निशियन, शस्त्रक्रियेला ओ.टी असिस्टंट, पेशंट केअर, डी. एम.एल.टी (लॅब टेक्निशियन) हे प्रोफेशनल कोर्स शिकवले जातात.

डॉ. गायकवाड्स इन्स्टिट्यूटचे ब्रीद वाक्यच आहे, १००% नोकरीची लेखी हमी. विद्यार्थ्यांचा उत्साह, जिद्द आणि मेहनत यामुळे गेली ३० वर्षे इन्स्टिट्यूटचा निकाल १००% लागत आहे. गेल्या ३० वर्षात एकही मुलगी जॉबलेस (बीन नोकरीची) नाही.

प्रत्येक कोर्सच्या विषयासाठी त्यांनी स्वतः १५ पुस्तके लिहिली आहेत. तीच शिकवली जातात आणि परीक्षा घेतली जाते. वेगळेपण जपणारे हे मोठे काम त्यांच्याकडून घडले आहे. याबद्दल डॉ. गायकवाड्स इन्स्टिट्यूटला इकोनॉमिक टाइम्स आयकॉन ऑफ एक्सेल्लेन्स व सेंट्रल भारत सेवक समाजतर्फे भारत कर्मश्री अवॉर्ड सारखे मानाचे अवॉर्ड्स देखील प्राप्त झाले आहेत.

वडील आणि मुलीमध्ये नेहमी एक सुंदर नातं असतं. ज्या मुलींचं आपल्या वडिलांसोबतच नातं सुंदर असतं. त्यांच्या वयाच्या प्रत्येक टप्प्यातील त्यांच्या आठवणी सुंदर असतात. आपल्या वडिलांबरोबर चांगलं नातं असल्यास आपल्या स्वभावावरही त्याचा परिणाम होत असतो.

जो भविष्यातील वैवाहिक आयुष्यावर प्रभाव टाकत असतो. जर वडील खूप रागीट किंवा त्यांचा सहवास न लाभल्यास मुलींमध्ये विश्वासाची कमतरता निर्माण होते आणि आयुष्यात येणाऱ्या पुरुषांशी वागण्याबाबत समस्या निर्माण होतात.

याउलट जर वडील सतत पाठिंबा देणारे आणि प्रेम करणारे असल्यास मुलीही तेवढ्याच आत्मविश्वास असलेल्या आणि कणखर बनतात. त्यामुळे मुलींच्या आयुष्यात वडिलांची भूमिका खूप महत्त्वपूर्ण आहे. डॉक्टर हेमंतराजे हे दुसऱ्या प्रकारचे बाप आहेत, त्यामुळे उगाच नाही मुलींना मदर्स डे पेक्षा फादर्स डे ची उत्सुकता असते.

फादर्स डे च्या निमित्ताने डॉ. हेमंतराजे गायकवाड यांना त्यांच्याकडे आजवर शिक्षण घेतलेल्या अनेक मुलींच्या पत्ररूपी लिहिलेल्या भावना पाहता डॉ हेमंतराजे या बापाला शुभेच्छा देण्यासाठी त्यांची धडपड असते हे लक्षात येते.

साहित्यामध्ये, व्यवहारामध्ये मातृमहती मोठ्या गौरवाने गायली जाते. परंतु पितृप्रेमाकडे तेवढे लक्ष दिले जात नाही. पित्याची माया ही मुकी असते. ती दिसत नाही. अंतरीची कळकळ कधीकधीच प्रकट होते. बोलकी होते.

बरेचदा तर आयुष्याच्या उत्तरार्धात माणसाच्या आठवणी जाग्या होतात आणि नियती माणसाला त्या त्या वयाच्या टप्प्यावर आणून बसवते तेव्हा माणसाला आपल्यातला 'बाप' कळतो.

आज आयुष्याचा अमृत महोत्सव साजरा करताना डॉ हेमंतराजे गायकवाड नावाचा बापमाणूस कृतार्थ आहे. अनेक मुलींचा फोन येतो आणि मोबाईलमधून आवाज येतो 'बाबा' कसे आहात.... तेव्हा तीन दशकातील अनेक आठवणी त्यांच्या मनाला उभारी देतात.

-------------------

**डॉ. गायकवाड्स इन्स्टिट्यूटचा पत्ता**
**२०३, आकांक्षा बिल्डिंग, एन सी केळकर रोड, दादर-पश्चिम, मुंबई ४०००२८**
**८६९१९७३८७४ /९३२१६९०६२५**
drgaikwadinstitute.com

■ ■ ■

# प्रेम व निःस्वार्थ मायेचा वटवृक्ष म्हणजेच माय!

आईचा मानसन्मान व्हावा या उद्देशाने जगात दरवर्षी मे महिन्याच्या दुसऱ्या रविवारी मातृदिन (मदर्स डे) साजरा केला जातो. त्या अनुषंगाने यावर्षी मातृदिन ११ मे २०२५ रविवारला येत आहे. त्यामुळे पितृत्व आणि मातृत्व या परिभाषांशी किती जवळचं आणि रक्ताचं नाते असते हे आपल्याला आई-वडील या शब्दावरूनच सहज समजून येते.

या जगात माय-बापाशिवाय कोणीही मोठा नाही. आई-वडील हा शब्द फक्त मानवजाती पुरताच सीमित नसून संपूर्ण जीवसृष्टी, पशुपक्षी व जीवजंतू या शब्दाशी निगडित आहे. तेव्हाच आपल्याला उत्पत्ती, संस्कार, संस्कृती, जडणघडण दिसून येते. ज्याप्रमाणे आई - वडील मुलांची जोपासना करते. त्याचप्रमाणे पशुपक्षी व संपूर्ण जीवसृष्टी आपल्या पिल्लांची (मुलांची) जोपासना करून लहाण्याचे मोठे करतात.

वडीलांवर आपल्या मुलांचीच नाही तर संपूर्ण कुटुंबाची मोठी जबाबदारी असते.त्यामुळे आर्थिकदृष्ट्या व इतर बाबतीत सुरक्षेची ढाल बनून वडील आपले कार्य तत्परतेने करीत असतो. त्यामुळे आई-वडीलांची भुमिका समान असते. आई नेहमी मायेचं पांघरूण घालते तर वडील कुटुंबाची रक्षा करून सुरक्षा कवचची भुमिका निभवत असतो. सर्वांनीच आई-वडीलांची सेवा व सन्मान करायला हवा. आईचा मानसन्मान करून मातृपितृ दिवस दररोज साजरा करायला पाहिजे.

परंतु, जगाला जाण रहावी म्हणून ठराविक दिवशी मातृदिनाला महत्व आहे. पितृ दिन असो किंवा मातृ दिन दोन्ही दिवस एकसमानच असतात यात यत्किंचितही फरक नाही. मातृदिनाचा इतिहास १८६० या दशकाशी संबंधित आहे. सर्वप्रथम मातृदिनाची सुरूवात १९०८ साली अमेरिकेतुन झाली. यानंतर पितृदिनाची मागणी व्हायला लागली व अधिकृतपणे १९१० ला पितृदिनाला सुरूवात झाली. मात्र पितृदिन साजरा करण्याच्या तारखांमध्ये मतभेद आहेत.

मातृत्व दिन (मदर डे) प्रमाणेच वडिलांचा आदर सन्मान व्हावा व कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी पितृदिन (फादर डे) साजरा केला जातो. जगातील कोणतीही भाषा असो मामा-मामी, काका - काकु, मावशी, आत्या असे अनेक नाते आहेत व यासाठी वेळोवेळे शब्दप्रयोग सुध्दा आहेत. परंतु जगातील कोणत्याही कानाकोपऱ्यात जा, तुम्हाला आई-वडील यांच्यासाठी एकच शब्द दिसेल. आई-बाबा, मम्मी-पप्पा अशाप्रकारे जगात एकच शब्द दिसून येईल . मानवी नातेसंबंध आणि जगातील वेगवेगळ्या नात्यातील एक नातं म्हणजे आई-वडिलांच नात.

प्रत्येक आई मुलांना घडवीते सुसंस्कृत करते पदोपदी मुलांची काळजी घेते यातच मातृत्व दडलेले दिसून येते. आई मुलांच्या सानिध्यात चोवीस तास असते. त्यामुळे आपले मुल काय करीत आहेत आणि आपण त्यांच्यासाठी काय केले पाहिजे याची चाहूल आईला कळते व त्यापध्दतीने मुलांचे संगोपन करीत असते.

आई अशी दैवी शक्ती आहे की आकाश पाताळ एक करते. परंतु मुलाला कधीच उपाशी ठेवत नाही. आई घरातील सर्वांचे जेवण झाल्यावरच जेवण करते. आई-वडीलांच नातं या भुतलावर अफाट आहे. वडिल भुक-तहान विसरून आपल्या कुटुंबाकरीता राबत्तो व घरग्रहस्ती चालवतो. म्हणजेच घराला आर्थिक बळ देण्याचे काम वडिल करीत असतात तर वडिलांनी केलेल्या कमाईच्या आधारे घर चालवण्याची मोठी जबाबदारी आईची असते.

**रमेश कृष्णराव लांजेवार**
**स्वतंत्र पत्रकार, नागपूर.**
**९९२१६९०७७९**

मोजक्या पैशात आईला घर चालवायचे असते. म्हणजे घरात काय कमी जास्त आहे हे सर्व आईलाच पहावे लागते व ही तिची मोठी कसोटीची परिक्षा असते. समाजात आईच्या कार्याला तोड नाही व वडिलांच्या कर्तुत्वाला कोणीही मात करू शकत नाही. म्हणुन सर्वांनीच लक्षात ठेवले पाहिजे की आपले खरे गुरु व दैवत आई-वडीलच आहे. त्यामुळे आजच्या तरुण पिढीने आई-वडीलांना प्रथम स्थानावर ठेवले पाहिजे.

आई या शब्दाला किती महत्त्व आहे हे आपण या ओवी वरून समजू शकतो. आई माझा गुरु, आई कल्पतरू सुखाचा सागर आई माझी, प्रीतीचे माहेर, शांतीचे आगर मांगल्याचे सारं आई माझी. म्हणजे आईविना जग नाही व वडीलांविना आधार नाही. आपल्याला थोडीशी जरी इजा किंवा दुर्घटना झाली तर मुलं आई ग... म्हणून किंचाळतो तेव्हा आईच्या रूपात कोणीना-कोणी अवश्य धावद्दन येतोच ही दैवी शक्ती आई या शब्दात आपल्याला दिसुन येते.

या उलटं वडिलांचे आहे. एखादी मोठी दुर्घटना घडली तर प्रत्येक व्यक्ती बापरे म्हणून जोरांनी ओरडतो अशा वेळी ताबडतोब आजुबाजुला असलेले नागरिक वडिलांची भूमिका बजावतात. म्हणजेच वडील तिथे नसतांना सुध्दा तेथील संपूर्ण नागरिक वडिलांची भूमिका बजावतात. अशा वेळी आपणही म्हणतो की लोक देवासारखे धावुन आले. म्हणजे आईग आणि बापरे या कठीण शब्दांसामोर सर्वसामान्य माणूस आपल्या आई-वडिलांची भुमिका बजावतात व दैवी रूपाने मदतीला धावून येतात.

मानवजातीमध्येच ज्याप्रमाणे आईची भूमिका असते त्याचप्रमाणे संपूर्ण पशुपक्षी व जीवसृष्टीमध्ये आईची भूमिका अग्रगण्य असल्याचे आपल्याला दिसून येते. कारण मुलांच्या आयुष्यात नेहमीच ती सुर्याच्या प्रकाशाप्रमाणे वावरत असते जेणेकरून मुलांच्या आयुष्यात कुठेही अंधक्कार पडणार नाही याची काळजी घेत असते.कारण आई आपल्या मुलांसाठी आपल्या जीवाचा आटापिटा करून मुलाला लहाण्याचा मोठा करते. त्यामुळे आज सर्वांचीच प्रथम जबाबदारी आहे की आपल्या आई-वडिलांची सेवा करणे, पालनपोषण करणे, त्यांच्या प्रकृतीची काळजी घेणे व त्यांच्या वेदना जाणुन घेऊन त्यांवर उपाययोजना करणे आणि आई-वडीलांना सुखी व समाधानी ठेवणे यातच आपल्याला खरा जागतिक मातृदिन दीसुन येईल.

माझ्यामते मातृदिन ठराविक दिवशीच का साजरा करावा? दररोज साजरा का करू नये? मातृत्व-पितृत्व दिवस हा दररोज आई-वडीलांची सेवा करून साजरा केला पाहिजे व आपण ते दिवस आठवायला पाहिजे की आपल्याला लहाण्याचे मोठे करण्यासाठी आईने किती यातना व दुःख सहन केले असावे. याची जाणीव आज मुलांनी ठेवण्याची गरज आहे.

आईने आपल्याला वटवृक्षाच्या छायेत लहाण्याचे मोठे केले व याच वटवृक्षाचा पहारेकरी म्हणून वडिलांनी आपली चोख भुमिका बजावली. आई- वडीलच्या तत्परतेमुळेच मुलांच्या केसालाही धक्का लागत नाही. मातृदिनाच्या निमित्ताने मी सर्वांना हेच सांगु इच्छितो की आपण सर्वांनी भारतीय संस्कृतीच जपायला हवी यातूनच आपल्याला खऱ्या अर्थाने आई-वडीलांची सेवा करता येईल.

पाश्चिमात्य देशात आई-वडील सोडून इतर नातेसंबंध अंकल व आंटी या दोन शब्दात संपुष्टात आली आहे. परंतु भारतीय संस्कृतीत आजी, आजोबा, काका, काकु, मामा, मामी, मावशी,आत्या इत्यादी अनेक वेगवेगळे शब्द आपल्याला वेगवेगळ्या नात्यांप्रमाणे दिसून येतात त्यांचा सन्मान व्हायलाच पाहिजे. त्यामुळे अंकल-आंटी हे पाश्चिमात्य शब्द विसरायला हवे. त्याचबरोबल मम्मी-पप्पा या शब्दांना पुर्णविराम देऊन आई-बाबा असे शब्द ऐकू आले तर भारतीय संस्कृतीचा सन्मानच अवश्य होईल असे मला वाटते.

सध्याच्या काळात काही मुल-मुली आई-वडिलांची सेवा करण्यास असमर्थ दिसून येतात अशा परिस्थितीत आई-वडिलांना वृध्दाश्रमाच्या खाईत लोटतात हेही आई-वडिलांच्या प्रती दुर्भाग्यच म्हणावे लागेल.

आपण ११ मे ला मातृदिन (मदर्स डे) साजरा करीत असतांना पृथ्वी



मातेचाही थोडासा विचार करायला हवा. आज पृथ्वीची जोपासना होत नसल्याने दिवसेंदिवस हवामानात बदल होत आहे. याकरीता जागतिक मातृदिनाचे औचित्य साधून प्रत्येक मुलांनी आई-वडीलांच्या आठवणीत रहावे, यासाठी आजच्या दिवशी एकतरी वृक्ष लावले पाहिजे.

यामुळे एकाच दिवशी देशासह संपूर्ण जगात लाखोंच्या संख्येने वृक्ष लागवड झाल्याचे आपल्याला दिसून येईल. यामुळे पृथ्वीचे संतुलन स्थिर रहाण्यास मोठी मदत होईल व आई-वडीलांना निसर्गाचा आनंद घेता येईल.

■ ■ ■

# मुल म्हणजे आईसाठी सर्वस्व

**प्रविण बागडे**
**नागपूर.**
**9923620919**

मातृदिन हा आईचा सन्मान करण्यासाठी साजरा केला जातो. दरवर्षी संयुक्त राज्य आणि इतर काही देशांमध्ये मे च्या दुसऱ्या रविवारी साजरा केला जातो. १९१२ मध्ये मदर्स डे चे संस्थापक अण्णा जार्विस यांनी मे मध्ये दुसरा रविवार आणि मदर्स डे या म्हणीचा ट्रेडमार्क केला आणि मदर्स डे इंटरनॅशनल असोसिएशनची स्थापना करुन माता आणि मातृत्वाच्या सन्मानार्थ मातृदिन साजरा करण्याची कल्पना सुचविली होती.

१९१४ मध्ये तिला राष्ट्रीय मान्यता मिळविण्यात यश आले. तेव्हापासुन या दिवशी लोक आईचा आदर म्हणुन तिला सप्रेम भेट म्हणून एखादी प्रिय वस्तू आणि शुभेच्छा देवून मदर्स डे साजरा करतात. तसेच हा कुटुंबातील किंवा व्यक्तीच्या आईचा तसेच मातृत्व, मातृबंध आणि समाजातील मातांचा प्रभाव यांचा सन्मान करणारा उत्सव आहे.

हा जगातील अनेक भागांमध्ये विविध दिवसांमध्ये साजरा केला जातो, सामान्यतः मार्च किंवा मे महिन्यांत हा साजरा केला जातो. काही देशात जसे बल्गेरिया आणि रोमानिया येथे जागतिक महिला दिन हा दिवस मदर्स डे म्हणून साजरा केला जातो.

भारतीय संस्कृतीत आधुनिक मदर्स डे आत्मसात करण्यात आला आहे आणि दरवर्षी मे महिन्याच्या दुसऱ्या रविवारी साजरा केला जातो. भारतीय लोक हा प्रसंग धार्मिक कार्यक्रम म्हणून साजरा करत नाहीत; त्याचा उत्सव मुख्यतः शहरी भागांपुरता मर्यादित आहे जेथे या प्रसंगाचे मोठ्या प्रमाणावर व्यापारीकरण केले गेले आहे.

या दिवशी मुले आई आणि आजी यांना भेटवस्तू देतात. हे अशाच प्रकारच्या उत्सवांना पूरक आहे, मुख्यत्वे व्यावसायिक हितसंबंधांमुळे, कुटुंबातील सदस्यांचा सन्मान करणे, जसे की फादर्स डे, सिबलिंग डे आणि आजी-आजोबांचा दिवस.

हजारो वर्षांपासून जगभरात अस्तित्त्वात असलेल्या माता आणि मातृत्वाच्या अनेक पारंपारिक उत्सवांशी त्याचा थेट संबंध नाही, जसे की ग्रीक पंथ ते सायबेले, मातृदेवता रिया, हिलारियाचा रोमन सण किंवा इतर ख्रिश्चन धर्मगुरू मदरिंग रविवारचा उत्सव मदर चर्चच्या प्रतिमेशी संबंधित आहे. तथापि, काही देशांमध्ये ह्यमातृदिनह्न अजूनही या जुन्या परंपरांचा समानार्थी आहे.

आई म्हणजे ममता, तसेच आई म्हणजे आत्मा आणि आई म्हणजे ईश्वर या दोघांचा संगम म्हणजे आई होय. मायेची पाखरण करणारी एक स्त्री. एखादी स्त्री जेव्हा आपल्या अपत्यास जन्म देते त्यावेळेस तिला मातृत्व प्राप्त होते आणि तेव्हाच समाजाच्या दृष्टीने ती त्या अपत्याची आई बनते.

आईचे खरे प्रेम आणि पालनपोषण या सोबत कशाचीही तुलना केली जाऊ शकत नाही. आमच्या आयुष्यातील ती एकमेव महिला आहे जी कोणत्याही हेतूशिवाय आपल्या मुलांवर भरपूर प्रेम करते. मूल म्हणजे आईसाठी सर्वस्व असते. ती एक चांगली श्रोता आहे आणि आम्ही सांगत असलेल्या आमच्या चांगल्या आणि वाईट गोष्टी ऐकत असते.

ती आम्हाला कधीही रोखत नाही आणि कोणत्याही प्रकारे आम्हाला बांधत नाही. ती आम्हाला चांगल्या आणि वाईट मधील फरक शिकवते. आई आम्हाला प्रत्येक आनंदात आणि दुःखात मदत करते, जेव्हा आपण आजारी असतो, तेव्हा ती आपल्यासाठी रात्रभर जागी राहुन आपल्या चांगल्या आरोग्यासाठी देवाची प्रार्थना करते.

शब्द मानवी भावनांशी निगडित असून त्यास माणसाच्या जीवनात अनन्यसाधारण महत्व प्राप्त झालेले आहे. स्त्रीने जन्म दिला नसतानाही ती सवतीच्या मुलाची किंवा दत्तक मुलाची आई बनते. आई ही शांतादुर्गाचे रूप आहे, मराठी भाषेतला आई हा आई मायेचा सागर आहे. मराठीतील प्रसिद्ध कवी यशवंत यांनी आपल्या कवितेत स्वामी तिन्ही जगाचा, आईविना भिकारी ही ओळ लिहून आई या शब्दाची महानताच थोडक्यात सांगीतले. आजच्या दिनी सर्वांना मदर्स डे च्या शुभेच्छा!

घर सुटतं पण आठवण
कधीच सुटत नाही !
जीवनात आई नावाचं पान
कधीच मिटत नाही !!

■ ■ ■

